महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com | epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

• संपादक : राकेश शंकर गोरे • वर्ष : १७ अंक : ३० पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६ ते सोमवार ०२ नोव्हेंबर २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

थोडक्यात

फटाका स्टॉलसाठी अग्निशामक विभागाचे NOC बंधनकारक!

■ **पुणे** : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने फटाका स्टॉलसाठी क्षेत्रीय कार्यालयाची परवानगी आणि अग्निशामक विभागाचे NOC बंधनकारक केले आहे. सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेकायदा स्टॉलवर थेट कारवाई केली जाईल. आगीचा धोका टाळण्यासाठी प्रत्येक स्टॉलवर वाळू, १ ते ५ हजार लिटर पाणी ठेवणे आणि नो-स्मोकिंग झोन पाळणे आवश्यक आहे. गेल्या वर्षी केवळ १०० विक्रेत्यांनी परवानगी घेतली असल्याने यंदा प्रशासन अधिक कडक पावले उचलत आहे.

नव्या वर्षापासून विना-सिम व्हॉट्सअॅप चालवणे होणार बंद: केंद्र सरकार

■ **नवी दिल्ली** : सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल अरेस्ट सारख्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी दूरसंचार विभागाने (DoT) मेसेजिंग ॲप्ससाठी ३१ डिसेंबर २०२६ ही 'सिम-बाइंडिंग'ची अंतिम मुदत दिली आहे. १ जानेवारी २०२७ पासून ज्या नंबरवर व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम सुरू आहे, ते सक्रिय सिम कार्ड त्याच फोनमध्ये असणे अनिवार्य असेल. सध्या सिम काढून केवळ वाय-फायवर ॲप वापरता येते, पण नव्या नियमांमुळे सिम दुसऱ्या फोनमध्ये असल्यास ॲपच्या वापरावर मर्यादा येतील.

आता ओटीपी पाहण्यासाठी मेसेजेस ॲप उघडावे लागणार?

■ **वृत्तसंस्था** : सायबर फसवणूक रोखण्यासाठी 'ट्राय' (TRAI) ओटीपीच्या नियमात बदल करण्याच्या तयारीत आहे. नव्या प्रस्तावानुसार, सुरक्षेसाठी ओटीपी आता थेट लॉक स्क्रीन किंवा नोटिफिकेशन बारवर दिसणार नाही; तो पाहण्यासाठी मेसेजेस ॲप उघडावे लागेल. तसेच या मेसेजमध्ये कंपनीचे नाव, व्यवहाराचा उद्देश आणि कोडची वैधता स्पष्टपणे लिहिलेली असेल. अद्याप याची अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी डिजिटल सुरक्षिततेसाठी नागरिकांनी सतर्क राहून ओटीपी कधीही शेअर न करणे आवश्यक आहे.

Vi रिचार्जवर मिळणार २५ हजारांपर्यंतचा मोफत मोबाईल विमा!

■ **वृत्तसंस्था** : Prepaid ग्राहकांसाठी वोडाफोन आयडियाने (Vi) देशातील पहिली 'रिचार्ज-लिंक्ड मोबाईल चोरी व विमा' सुविधा सुरू केली आहे. कंपनीच्या ₹६१, ₹२०१ आणि ₹२५१ या डेटा ॲड-ऑन रिचार्जवर डेटासह ₹२५,००० पर्यंतचे मोफत विमा संरक्षण मिळेल. फोन चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास पूर्णपणे डिजिटल पद्धतीने हा क्लेम करता येईल. यासोबतच कुटुंबात कुठेही डेटा शेअर करण्यासाठी कंपनीने 'Vi प्रीपेड फॅमिली प्लॅन' देखील लाँच केला आहे.

इंटरनेटशिवाय कीपॅड फोनवरून होणार UPI पेमेंट!

■ **वृत्तसंस्था** : इंटरनेट आणि स्मार्टफोन नसणाऱ्यांसाठी Itel ने आपल्या Itel 2165C या कीपॅड (फीचर) फोनमध्ये 'फोनपे' (PhonePe) सपोर्टची घोषणा केली आहे. यामुळे २G नेटवर्क वापरणारे युजर्सही आता इंटरनेटशिवाय थेट डिजिटल पेमेंट करू शकणार आहेत. या २-इंच डिस्प्ले असलेल्या फोनमध्ये १२,००mAh ची दमदार बॅटरी असून, ती २५ दिवसांचा स्टँडबाय टाईम देते. जास्तीत जास्त लोकांपर्यंत यूपीआय सुविधा पोहोचवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

टोरंट पॉवर प्रकल्पावरून राजकारण तापले !

■ **पुणे (अभिजीत येरल्लू) : रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित टोरंट पॉवर कंपनीच्या पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पावरून राजकीय वातावरण तापले आहे. प्रकल्पासाठी ३२ हजार ४८० झाडे तोडली जाणार असल्याचा दावा होत असून, पर्यावरणप्रेमी आणि विरोधकांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र आरोप फेटाळून लावत प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याचा दावा केला आहे.**



कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी परिसरातील सायडोंगर येथे हा प्रकल्प प्रस्तावित आहे. त्यासाठी ६४० एकर वनजमीन देण्यात आल्याचे आणि हजारो झाडे तोडली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. ग्रामपंचायतीचा ठराव न घेता तसेच स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात न घेता प्रकल्प पुढे नेल्याचा आरोपही होत आहे. माजी पर्यावरण मंत्री आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी या मुद्द्यावरून भाजप सरकारवर टीका केली. स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींचा विरोध असताना वृक्षतोडीला परवानगी कोणाच्या दबावाखाली देण्यात आली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. खासगी कंपनीचे हित जपण्यासाठी महाराष्ट्राच्या पर्यावरणाचा बळी दिला जात आहे का, असा प्रश्नही त्यांनी विचारला. राज्यातील काही भागांत दुष्काळी परिस्थिती असताना जंगलतोड करून महाराष्ट्राला वाळवंट बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे का, अशी टीकाही त्यांनी केली. प्रकल्पाच्या भूमिपूजनासाठी घाई केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे कर्जत दौऱ्यावर जाणार असून, वृक्षतोड सुरू असलेल्या परिसराची पाहणी करणार आहेत. यावेळी त्यांची जाहीर सभाही होणार आहे. या सभेत ते काय भूमिका मांडतात आणि पुढील आंदोलनाबाबत काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे. ▸ पान २ वर

मतदार वगळल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची निवडणूक आयोगाला नोटीस

■ **मुंबई (नितीन देवळेकर)** : महाराष्ट्रातील विशेष पुनरीक्षण मोहिमेदरम्यान मतदार यादीतून सुमारे ३३ टक्के मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. या प्रकरणी आयोगाला उत्तर दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले असून, पुढील सुनावणी ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मात्र, मतदार यादीतील नोंदणी तसेच दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत वाढवण्याची मागणी न्यायालयाने तूर्तास मान्य केलेली नाही. अरुण आनंदगिरी यांनी ही याचिका दाखल केली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी बाजू मांडली. दातार यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये



सध्या सुमारे ३, ५०० पुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. जुन्या इमारती आणि सोसायट्या पाडण्यात आल्यामुळे हजारो रहिवाशांना तात्पुरते अन्य ठिकाणी स्थलांतरित व्हावे लागले आहे. त्यामुळे त्यांच्या सध्याच्या पत्त्यांमध्ये आणि जुन्या नोंदींमध्ये तफावत निर्माण झाली असून, परिणामी अनेक मतदारांची नावे यादीतून वगळली जाण्याची शक्यता आहे. आधीच्या मतदार याद्यांमध्ये नावे समाविष्ट असलेल्या नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्र अर्जाची व्यवस्था करावी, अशी मागणीही याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केली. आधीच नोंदणीकृत मतदारांना पुन्हा 'फॉर्म-६' भरण्यास सांगणे चुकीचे असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. हा अर्ज प्रामुख्याने प्रथमच मतदार म्हणून नोंदणी करणाऱ्यांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत वाढवावी, तसेच न्यायालयातील सुनावणी पूर्ण होईपर्यंत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यास स्थगिती द्यावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली. न्यायालयाने तूर्तास मुदतवाढ देण्यास नकार दिला असला, तरी प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेण्याचे स्पष्ट केले. ▸ पान २ वर

आरक्षण खिडकीवरील तिकिटांवरही मिळणार ४५ पैशांत प्रवास विमा!

■ **नवी दिल्ली (प्रगती शर्मा)** : रेल्वेने प्रवास करणाऱ्या कोट्यवधी प्रवाशांसाठी २७ ऑक्टोबर २०२६ पासून महत्त्वाचा बदल लागू होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता रेल्वेच्या आरक्षण काउंटरवरून तिकीट घेणाऱ्या प्रवाशांनाही प्रवास विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आतापर्यंत ही सुविधा प्रामुख्याने आयआरसीटीसी (IRCTC) च्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन तिकीट बुक करणाऱ्या प्रवाशांपुरती मर्यादित होती. ऑनलाइन तिकीट बुक करताना नाममात्र शुल्क भरून प्रवासी विम्याचा पर्याय निवडू शकत होते, मात्र काउंटरवरून तिकीट घेणाऱ्या प्रवाशांना ही सुविधा मिळत नव्हती.



सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार हा भेद दूर करण्यात आला आहे. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ओडिशातील जून २०२३ च्या रेल्वे अपघातासंदर्भातील याचिकेच्या सुनावणीदरम्यान हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. नव्या व्यवस्थेनुसार काउंटरवरून जारी होणाऱ्या सर्व रेल्वे तिकिटांवरही प्रवास विमा लागू होणार असून त्यामुळे अधिकाधिक प्रवाशांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे. या प्रवास विम्याअंतर्गत अपघातात मृत्यू झाल्यास लाभार्थ्यांना ₹१० लाखांपर्यंत, पूर्ण कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ₹१० लाख, अंशतः कायमस्वरूपी अपंगत्व झाल्यास ₹७.५ लाख, उपचारासाठी ₹२ लाखांपर्यंत तसेच मृतदेह वाहतुकीसाठी ₹१० हजारांपर्यंतची आर्थिक मदत मिळू शकते. मात्र, प्रत्येक प्रकरणात विम्याची कमाल रक्कम मिळेलच असे नाही. संबंधित विमा पॉलिसीच्या अटी व शर्तींनुसार दाव्याची रक्कम निश्चित केली जाईल. सध्या ऑनलाइन तिकिटांसाठी करांसह प्रति प्रवासी ४५ पैशांचा विमा प्रीमियम आकारला जातो. मात्र, काउंटर तिकिटांसाठी किती शुल्क आकारले जाईल, याबाबत रेल्वेकडून अद्याप अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच विमा प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया आणि दावा दाखल करण्याची पद्धतही लवकरच स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. अपघात झाल्यास प्रवाशांनी तिकीट, प्रवासाशी संबंधित नोंदी, रुग्णालयातील उपचारांची कागदपत्रे आणि इतर आवश्यक दस्तऐवज जतन करून ठेवावेत, जेणेकरून विमा दावा करताना अडचण येणार नाही. दरम्यान, पाच वर्षांखालील आणि स्वतंत्र आसन किंवा बर्थ नसलेल्या मुलांना सध्याच्या योजनेत विमा संरक्षण लागू होत नाही, तर पाच ते अकरा वर्षे वयोगटातील मुलांना नियमानुसार विमा लाभ मिळू शकतो.

पोलीस आयुक्तांची विनंती, म्हणून डॉक्युमेंट्रीची पोस्ट डिलीट- राज ठाकरे

■ **मुंबई (प्रथमेश चव्हाण)** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदाणी यांच्यावरील डॉक्युमेंट्रीची सोशल मीडियावरील पोस्ट डिलीट करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई पोलीस आयुक्तांनी केलेल्या विनंतीचा मान राखून ही पोस्ट हटवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, "जी आग लागायची ती लागली आहे. जानेवारी २०२६ मध्ये शिवतीर्थावरून पेटवलेला वणवा पुढेही कायम राहील, " असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. सबिर भाटिया यांनी तयार केलेली ही डॉक्युमेंट्री राज ठाकरे यांनी २२ ऑक्टोबर रोजी आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंट्सवरून शेअर केली होती. या डॉक्युमेंट्रीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योगपती गौतम अदाणी यांना दिलेल्या पाठिंब्याबाबत आणि त्यातून झालेल्या राजकीय फायद्याबाबत भाष्य करण्यात आले होते. राज ठाकरे यांच्या माहितीनुसार, या पोस्टला ट्विटरवर ४८ लाखांहून अधिक प्रतिसाद मिळाला, तर फेसबुकवरही तिला मोठा प्रतिसाद मिळाला. या पोस्टमागील भूमिका स्पष्ट करताना राज ठाकरे म्हणाले की, हा गंभीर विषय लोकांपर्यंत पोहोचवून देशाचे प्रबोधन करणे हाच आपला उद्देश होता आणि तो साध्य झाला आहे. जानेवारी २०२६ मध्ये मुंबईतील शिवतीर्थावर झालेल्या सभेत या विषयावर सविस्तर सादरीकरण केले होते. देश एकाधिकारशाहीच्या दिशेने कसा जात आहे, हे त्यावेळी दाखवून दिल्याचेही त्यांनी सांगितले. "माझा कोणत्याही व्यक्तीला विरोध नाही, तर एकाधिकारशाहीला विरोध आहे. पंतप्रधानांनी देशातील सर्व उद्योगपतींना प्रोत्साहन देऊन रोजगार आणि संपत्ती निर्माण करावी. मात्र, केवळ एकाच उद्योगपतीचे लाड पुरवले जाणार असतील आणि त्यातून परिस्थिती बिकट होणार असेल, तर आमचा त्याला विरोध राहील, " असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. ▸ पान २ वर



चार शहरे राज्याच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' ठरणार: फडणवीस

■ **नवी मुंबई (धनश्री सट्टा)** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र (नैना) प्रकल्पातून सुमारे १५ लाख रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या रोजगारांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना प्राधान्य देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पुढील ५० वर्षांत ठाणे, नवी मुंबई, रायगड आणि पालघर हे महाराष्ट्राच्या विकासाचे प्रमुख केंद्र ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे नैना प्रकल्पातील पायाभूत सुविधांचे भूमिपूजन, प्रकल्पग्रस्तांना मालमत्ता पत्रकांचे वाटप आणि विमानतळाला जोडणाऱ्या पुलांचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. विमानतळाच्या पूर्वेकडील जोडणीसाठी ९५३ कोटी रुपये



खर्चून उभारलेल्या एसबीआर-९, बीआर-४ आणि बीआर-५ पुलांसह ५० कोटी रुपये खर्चाच्या उरण बायपास पुलाचे लोकार्पण झाले. नांदगाव आणि देवद येथील प्रकल्पग्रस्तांना मालमत्ता पत्रके देण्यात आली. नैना प्रकल्पातून अपेक्षित १५ लाख रोजगारांपैकी पाच लाख रोजगार उच्च वेतनाचे, तर दहा लाख रोजगार प्राथमिक ते मध्यम स्वरूपाचे असतील, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली. ▸ पान २ वर

राज्यात ३०५ तालुक्यांत दुष्काळ; चारा टंचाईवर 'मिशन मुरघास'

■ **पुणे (अकिल शेख)** : राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला असून, पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे राज्यभर 'मिशन मुरघास' ही जनजागृती व कृती मोहीम राबवण्यात येत आहे. उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने मुरघासमध्ये रूपांतर करून भविष्यातील चाराटंचाईवर मात करणे, हा या मोहिमेचा उद्देश असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. दुष्काळात हिरव्या चाऱ्याची उपलब्धता घटल्यास जनावरांचे आरोग्य, दुग्धोत्पादन आणि पशुपालकांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी २०२६-



२७ च्या खरीप हंगामात वैरण बियाणे वाटपासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून ४८.२० कोटी आणि विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत तीन कोटी, असा एकूण ५१.२० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. चाराटंचाईच्या पार्श्वभूमीवर आणखी ७६.४१ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध केला आहे. त्यात जिल्हा वार्षिक योजनेचे ६६.४१ कोटी आणि दुग्धविकास प्रकल्पाचे १० कोटी रुपये आहेत. या निधीतून सिंचन सुविधा असलेल्या क्षेत्रात चारा लागवड करून मुरघास निर्मिती केली जाणार आहे. मोहिमेंतर्गत शेतकरी आणि पशुपालकांना चाऱ्याची योग्य वेळी कापणी, कुट्टी, दाबणी आणि हवाबंद साठवणुकीचे शास्त्रीय प्रशिक्षण दिले जाईल. ▸ पान २ वर

"महाराष्ट्र माझ्या हातात कधी देताय, याची मी वाट पाहतोय", राज ठाकरेंचं विधान

■ **मुंबई (विशाल कारंडे)** : मुंबईसह राज्यातील शहरांमधील वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली. वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी कठोर नियम आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "महाराष्ट्र माझ्या हातात कधी येतोय, याची मी वाट पाहतोय, " असे विधान त्यांनी नवी मुंबईतील वाहतूक सेनेच्या व्यावसायिक वाहन प्रदर्शन



आणि भव्य वाहतूकदार मेळाव्यात केले. वाहतूकदारांशी चर्चा केल्याचा उल्लेख करत राज ठाकरे म्हणाले की, ई-चलानला विरोध नाही; मात्र ते ज्या पद्धतीने आकारले जाते, त्याची तपासणी झाली पाहिजे. ई-चलान कॅमेऱ्याच्या माध्यमातून दिले जावे. प्रत्यक्ष व्यक्तींकडे जाऊन चलान फाडण्याच्या प्रकारावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला असून, तो भविष्यात आणखी आक्राळविक्राळ होणार असल्याचे त्यांनी सांगितले. वाहतुकीसाठी आवश्यक नियम आणि बंधनांची चौकटच पुरेशी नसल्याची टीकाही त्यांनी केली. देशातील वाहतूक व्यवस्था पाहून देशाचे वर्तमान आणि भविष्य लक्षात येते, असे ते म्हणाले. वाहन कसे चालवायचे आणि पार्किंग कसे करायचे, याबाबत नागरिकांबरोबरच सरकारलाही पुरेशी जाणीव नसल्याचे त्यांनी नमूद केले. रस्ते आणि पूल बांधताना दीर्घकालीन नियोजन केले जात नाही. दोन वर्षांनी पुन्हा कामे काढावी लागतील, अशा पद्धतीने रस्त्यांची कामे होत असल्याची टीका त्यांनी केली. वाहतूक सिग्नल असतानाही पुढे वाहतूक पोलीस उभे असतात, यावर त्यांनी उपरोधिक टिप्पणी केली. पूर्वी रात्री एक वाजताही मुंबईत सिग्नल सुरू असेल तर वाहने थांबत होती; मात्र आता दुपारी एक वाजताही सिग्नल पाळला जात नसल्याचे त्यांनी सांगितले. ▸ पान २ वर

स्पीडपोस्ट सेवेची व्याप्ती वाढली; महाराष्ट्रात २७ नवीन मार्गिका

■ **मुंबई (गणेश बागडे)** : ग्राहकांना अधिक चांगल्या आणि जलद सेवा देण्याच्या उद्देशाने भारतीय टपाल विभागाने प्रीमियम २४ स्पीड पोस्ट सेवेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र सर्कलने सध्याच्या मेट्रो-टू-मेट्रो नेटवर्कच्या पलीकडे या सेवेची व्याप्ती वाढवण्याची घोषणा केली असून, एकूण २७ नवीन मार्गिका कार्यान्वित करण्यात येणार आहेत. यामध्ये कागदपत्रांसाठी २५, तर पार्सल सेवेसाठी दोन मार्गिकांचा समावेश आहे. मुंबई, ठाणे, नवी



मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर येथील किरकोळ तसेच घाऊक ग्राहकांना जलद आणि वेळेत वितरणाची सुविधा उपलब्ध करून देणे, हा या विस्तारामागील प्रमुख उद्देश आहे. सध्या २४ स्पीड पोस्ट सेवा दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आणि कोलकाता या सहा प्रमुख शहरांना जोडते. मुंबईतील २९ नियुक्त टपाल कार्यालयांमध्ये इतर मेट्रो शहरांसाठी २४ स्पीड पोस्टचे बुकिंग स्वीकारले जाते, तर या सेवेद्वारे येणाऱ्या टपालाचे संपूर्ण शहरात वितरण केले जाते. नव्या मार्गिकांमुळे अधिक वितरण पिन कोडपर्यंत जलद सेवा पोहोचवता येणार आहे. नवीन मार्गिकांमध्ये मुंबईहून बाहेर जाणाऱ्या सहा मार्गिकांचा समावेश आहे. यांद्वारे मुंबईला एनसीआर, ठाणे व नवी मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर आणि अहमदाबादशी जोडले जाणार आहे. ▸ पान २ वर

५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपने राजकारणात खळबळ

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. या क्लिपमध्ये ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात येत असून, या प्रकरणाचे धागेदोरे भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी जोडले जात असल्याचे आरोप केले जात आहेत. मात्र, संबंधित ऑडिओ क्लिपची सत्यता अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणातील आरोप, त्यावर संबंधित नेत्यांनी दिलेले स्पष्टीकरण आणि निष्पक्ष चौकशीची मागणी यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कथित ऑडिओ क्लिपची न्यायवैज्ञानिक तपासणी करण्याचे निर्देश दिल्यानंतर या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले. त्यानंतर विशेष तपास पथक अर्थात एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून सक्तवसुली संचालनालयामार्फत (ईडी) तपास करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे हा वाद आता केवळ राजकीय आरोपांपुरता मर्यादित न राहता, तपास यंत्रणांच्या संभाव्य चौकशीपर्यंत पोहोचला आहे.

नेमके प्रकरण काय आहे? - मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ऑक्टोबर २०२६ मध्ये जालना येथे पत्रकार परिषद घेऊन कथित ऑडिओ क्लिप सार्वजनिक केली. या संभाषणात जरांगे पाटील यांच्यापर्यंत शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून ५०० कोटी रुपये पोहोचल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. श्रीकांत शिंदे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आहेत. जरांगे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, मराठा आरक्षण आंदोलनाचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि त्यांची राजकीय भूमिका नियंत्रित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचा या संभाषणातून संकेत मिळतो. त्यांनी या प्रकरणाचा संबंध २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीशी जोडला आहे. कथित संभाषणात काही राजकीय व्यक्ती आंदोलनाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या राजकीय परिस्थितीचा कसा विचार करत होत्या, याविषयी चर्चा झाल्याचा दावाही करण्यात आला आहे. मात्र, या दाव्यांवरून कोणताही अंतिम निष्कर्ष काढणे सध्या योग्य ठरणार नाही. ऑडिओ क्लिपमधील आवाज कोणाचे आहेत, संभाषणाचा नेमका संदर्भ काय आहे आणि त्यातील आर्थिक व्यवहाराचा उल्लेख प्रत्यक्ष घटनेशी संबंधित आहे का, हे तपासातूनच स्पष्ट होऊ शकते.

जरांगे पाटील यांची भूमिका; निष्पक्ष चौकशीची मागणी - मनोज जरांगे पाटील यांनी कथित ऑडिओ क्लिपला आपल्या आरोपांच्या समर्थनार्थ पुरावा म्हणून सादर केले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आपण सातत्याने भूमिका मांडत असल्याने आपली प्रतिमा मलिन करण्याचा आणि आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष घालून चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. कथित संभाषणातील दाव्यांची सत्यता समोर आणावी आणि संबंधित व्यक्तींची भूमिका स्पष्ट व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे. या वादात शिवसेना नेते रामदास कदम यांच्या प्रतिक्रियेचाही उल्लेख होत आहे. कदम यांनी कथित ऑडिओ क्लिप जुनी असल्याचा दावा करत ती इतका काळ समोर का आली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर जरांगे पाटील यांनी क्लिपची तारीख आणि तिच्याबद्दल आधीपासून माहिती असण्याच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित केले. या परस्परविरोधी भूमिकांमुळे क्लिपचा स्रोत, ती सार्वजनिक होण्याची वेळ आणि तिच्या प्रसारामागील परिस्थिती हे मुद्देही चर्चेत आले आहेत.

फडणवीसांकडून न्यायवैज्ञानिक तपासाचे निर्देश - या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कथित ऑडिओ क्लिपची न्यायवैज्ञानिक तपासणी करण्याचे निर्देश दिले. क्लिपमधील आवाज नेमके कोणाचे आहेत, संभाषण खरे आहे की त्यात फेरफार करण्यात आला आहे आणि ही क्लिप इतक्या कालावधीनंतर समोर येण्यामागील कारण काय आहे, याची तपासणी होणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे आदेश मुंबई पोलिस आयुक्तांना दिल्याची माहिती समोर आली. त्यामुळे तपासाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. कथित ऑडिओ क्लिपमधील आवाजांची ओळख पटवणे, संभाषणाचा संदर्भ निश्चित करणे, मूळ ध्वनिमुद्रणाचा स्रोत शोधणे आणि संबंधित दाव्यांना पुष्टी देणारे किंवा त्यांचे खंडन करणारे पुरावे तपासणे, हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे मुद्दे ठरू शकतात. ऑडिओ क्लिपची डिजिटल किंवा तांत्रिक पडताळणी महत्त्वाची असली, तरी केवळ आवाज ओळखणे पुरेसे ठरणार नाही. संभाषणातील विधानांचा संदर्भ, त्याची तारीख, ध्वनिमुद्रणाची अखंडता आणि कथित आर्थिक व्यवहारासंबंधी स्वतंत्र पुरावे यांचीही पडताळणी आवश्यक ठरू शकते. तपास यंत्रणा कोणत्या निष्कर्षापर्यंत पोहोचतात, हे अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच स्पष्ट होईल.

एकनाथ शिंदे आणि भाजपची भूमिका - या प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे पुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नावांचा उल्लेख होत असल्याने शिवसेनेनेही या आरोपांवर आक्षेप घेतला आहे. एकनाथ शिंदे यांनी ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराशी संबंधित आरोप फेटाळले आहेत. श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत जरांगे पाटील यांना पैसे देण्यात आल्याचा दावाही त्यांनी नाकारला आहे. शिवसेनेतील काही नेत्यांनी या क्लिपमुळे एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह काही नेत्यांनी क्लिपची न्यायवैज्ञानिक तपासणी, सायबर तपास आणि एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. संभाषणातील आवाज कोणाचे आहेत, क्लिप कुठे आणि कधी तयार झाली आणि ती सार्वजनिक कशी झाली, या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, भाजपनेही या कथित क्लिपशी संबंधित आरोप फेटाळले आहेत. काही भाजप नेत्यांनी ध्वनिमुद्रण बनावट असण्याची किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) साहाय्याने त्यात फेरफार करण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली आहे. संबंधित आवाज आपले नसल्याचे काही नेत्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे क्लिप खरी आहे की बनावट, हा या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. या सर्व प्रतिक्रिया पाहता, सत्ताधारी महायुतीतील दोन प्रमुख घटक पक्षांमध्ये या प्रकरणावरून अविश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, राजकीय नेत्यांच्या आरोपांवरून पक्षांमध्ये प्रत्यक्ष मतभेद किती आहेत, याचा अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी अधिकृत भूमिका आणि पुढील घडामोडी तपासणे आवश्यक आहे.

संजय राऊत यांची ईडी चौकशीची मागणी - या प्रकरणात विरोधकांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी २६ ऑक्टोबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून कथित ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराची ईडीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली. राऊत यांनी या प्रकरणात एवढी मोठी रक्कम कुठून आली, ती कोणाकडे पाठवण्यात आली आणि कथित व्यवहार प्रत्यक्षात झाला असेल तर पैशांचे पुढे काय झाले, याची चौकशी करण्याची गरज व्यक्त केली. त्यांच्या मते, या प्रकरणातील आर्थिक व्यवहाराच्या दाव्यांची तपासणी आर्थिक गैरव्यवहाराच्या दृष्टीनेही व्हायला हवी. राऊत यांच्या मागणीमुळे या प्रकरणाला आणखी एक राजकीय आयाम मिळाला आहे. एका बाजूला राज्य सरकारकडून पोलिस आणि न्यायवैज्ञानिक तपासाची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तर दुसरीकडे विरोधक केंद्रीय तपास यंत्रणेच्या चौकशीची मागणी करत आहेत. तथापि, ईडी चौकशीची मागणी करण्यात आली आहे म्हणजे ती चौकशी अधिकृतपणे सुरू झाली आहे, असा अर्थ होत नाही. त्यासाठी संबंधित यंत्रणेकडून अधिकृत निर्णय किंवा घोषणा होणे आवश्यक आहे.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वादाचे महत्त्व - मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन हे महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या प्रश्नाशी जोडलेले आहे. त्यामुळे त्यांच्या नावाभोवती निर्माण झालेला हा वाद केवळ दोन राजकीय पक्षांमधील आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित राहत नाही. या प्रकरणाचा परिणाम मराठा आरक्षण आंदोलनाबद्दलच्या सार्वजनिक चर्चेवर आणि आंदोलनाशी संबंधित नेत्यांच्या विश्वासार्हतेबद्दलच्या चर्चेवरही होऊ शकतो. आरक्षणाच्या मागणीवरून यापूर्वीही राज्यात अनेकदा आंदोलने, चर्चा आणि राजकीय भूमिका समोर आल्या आहेत. अशा परिस्थितीत आंदोलनाच्या नेतृत्वावर आर्थिक व्यवहाराचे आरोप होत असतील, तर त्यांची सत्यता पडताळणे महत्त्वाचे ठरते. त्याच वेळी, एखाद्या कथित ध्वनिमुद्रणातील संभाषणाच्या आधारे संबंधित व्यक्तींना दोषी ठरवणेही योग्य ठरणार नाही. या प्रकरणात आरोप करणाऱ्यांनी मांडलेले दावे, संबंधित नेत्यांनी दिलेले नकार आणि तपासातून समोर येणारे पुरावे यांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा व्यक्तीला केवळ आरोपांच्या आधारे दोषी ठरवण्याऐवजी निष्पक्ष तपासातून वस्तुस्थिती समोर येणे, हे लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

तपासासमोर कोणते प्रश्न? - या प्रकरणातील सत्य स्पष्ट करण्यासाठी तपास यंत्रणांसमोर काही मूलभूत प्रश्न असतील. सर्वप्रथम, कथित ऑडिओ क्लिपमधील आवाजांची ओळख पटवणे आवश्यक आहे. त्यानंतर ध्वनिमुद्रणात कोणताही बदल, संपादन किंवा एआयच्या साहाय्याने फेरफार झाला आहे का, याची तांत्रिक तपासणी करावी लागेल. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे क्लिपची निर्मिती आणि प्रसार. संभाषण कधी झाले, त्याचा मूळ स्रोत कोणता, ते कोणत्या परिस्थितीत ध्वनिमुद्रित करण्यात आले आणि इतक्या कालावधीनंतर ते सार्वजनिक का झाले, या प्रश्नांची उत्तरे महत्त्वाची ठरतील. तिसरे म्हणजे, कथित ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा दावा स्वतंत्र आर्थिक पुराव्यांवरून तपासता येतो का, हे पाहावे लागेल. केवळ संभाषणातील उल्लेख आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार यांत फरक असतो. त्यामुळे संबंधित दाव्यांना पुष्टी देणारे दस्तऐवज, आर्थिक नोंदी किंवा इतर पुरावे उपलब्ध आहेत का, याची तपासणी आवश्यक ठरू शकते.

चौथा मुद्दा म्हणजे या क्लिपचा राजकीय वापर. क्लिप सार्वजनिक करण्यामागे कोणाचा हेतू होता, याचा विचार तपासाच्या दृष्टीने होऊ शकतो; मात्र हेतूबाबतचा निष्कर्षही पुराव्यांच्या आधारेच काढणे गरजेचे आहे.

निष्कर्ष : आरोपांपेक्षा पुराव्यांना महत्त्व - मनोज जरांगे पाटील यांच्या कथित ऑडिओ क्लिपमुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले असून, महायुतीतील भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्येही या मुद्द्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे निर्देश दिले आहेत, तर संजय राऊत यांनी ईडी तपासाची मागणी केली आहे. जरांगे पाटील यांनीही या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी कायम ठेवली आहे.मात्र, सध्या या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे कथित ऑडिओ क्लिपची सत्यता अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध झालेली नाही. त्यामुळे ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराबाबत किंवा त्यात उल्लेख झालेल्या व्यक्तींच्या भूमिकेबाबत अंतिम निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. आता एसआयटी आणि न्यायवैज्ञानिक तपासातून कोणती माहिती समोर येते, क्लिपमधील आवाजांची ओळख पटते का आणि कथित आर्थिक व्यवहाराला पुष्टी देणारे पुरावे मिळतात का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन निष्पक्ष चौकशी, पारदर्शकता आणि पुराव्यांच्या आधारे सत्य समोर येणे, हीच या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाची अपेक्षा आहे.

पान १ वरून...

मतदार वगळल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची...

आवश्यक कागदपत्रे सादर करण्यापासून नागरिक वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्यास, पुढील टप्प्यावर मुदतवाढ देण्याचे निर्देश देता येतील, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. त्यामुळे आता निवडणूक आयोगाच्या उत्तराकडे आणि ५ नोव्हेंबरच्या सुनावणीकडे लक्ष लागले आहे.

चार शहरे राज्याच्या विकासाचे...

सुनियोजित शहरी विकासातून उद्योग आणि रोजगाराच्या संधी वाढतात. पुढील सहा ते आठ महिन्यांत वरळीपासून नवी मुंबई विमानतळापर्यंत सिग्नलविरहित प्रवास शक्य होईल, असेही ते म्हणाले. नैना प्रकल्पाला अपेक्षित गती मिळाली नव्हती. जमीन संपादनानंतर हक्काचे भूखंड मिळतील का, अशी शंका शेतकऱ्यांना होती. १९७० मधील भूसंपादनाच्या मोबदल्यातील नुकसानभरपाईचे भूखंड अद्याप मिळाले नसल्याने सिडकोवरील विश्वास कमी झाल्याचे नमूद करण्यात आले. हा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी मालमत्ता पत्रकांचे वाटप, जमिनींच्या नोंदींतील त्रुटी दूर करणे आणि भूखंडांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील प्रमुख रस्ते एक्सेस कंट्रोल मार्ग आणि ग्रीडने जोडले जात असून, राज्याच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकापर्यंत सात तासांत पोहोचता येईल, असे नियोजन आहे. नैना प्रकल्पामुळे तिसऱ्या मुंबईच्या विकासाला गती मिळत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. नैना क्षेत्रातील विकास शुल्क आणि बेटरमेंट चार्ज शून्य करण्यात आले असून, फ्रीहोल्डची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या नियमितीकरणाचा प्रश्नही लवकर सोडविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. स्थानिक शेतकरी आणि भूमिपुत्रांना विकासाचे भागीदार बनवून रोजगार व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे, हे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

राज्यात ३०५ तालुक्यांत दुष्काळ...

सहकारी दूध संघ, दूध संकलन संस्था, महिला बचत गट, ग्राम संघ, शेतकरी उत्पादक गट, कृषी विज्ञान केंद्रे आणि ग्रामस्तरीय यंत्रणेच्या सहभागातून प्रात्यक्षिके आयोजित केली जातील. मका, ज्वारी आणि नेपिअर या कमी कालावधीत व तुलनेने कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या चारा पिकांवर भर असेल. दरम्यान, विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात १९ जिल्ह्यांत 'मागेल त्याला मुरघास' योजना राबवली जात आहे. पात्र पशुपालकांना प्रतिजनावर प्रतिदिन पाच किलो मुरघास, ९० दिवसांसाठी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रतिकिलो तीन रुपये अनुदान देय आहे. खरेदीचा पुरावा सादर केल्यानंतर अनुदान थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा होईल. पात्र शेतकरी व पशुपालकांनी https: /vmddp.com/ या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

पोलीस आयुक्तांची विनंती, म्हणून...

यावेळी त्यांनी भीमाशंकर येथील वनजमिनींच्या हस्तांतरणावरून सत्ताधाऱ्यांवर आरोप केले. "भीमाशंकर येथील शेकडो हेक्टर वनजमीन गुजरातच्या टोरेंट कंपनीच्या घशात घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्राची संपत्ती मित्रांच्या स्वाधीन केली जात असताना राज्यातील आमदार, खासदार आणि मंत्री गप्प कसे? सत्तेसमोर असे शरण जाणे महाराष्ट्राच्या परंपरेला शोभणारे नाही, " अशी टीका त्यांनी केली. डॉक्युमेंट्रीला मिळालेल्या प्रतिसादामुळे सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असावी, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या पोस्टमुळे आपले गुपित उघड होण्याची भीती निर्माण झाल्याने ती हटवण्याची विनंती करण्यात आली असावी, असे ते म्हणाले. मुंबई पोलीस आयुक्तांच्या विनंतीबाबत बोलताना राज ठाकरे यांनी मुंबई आणि महाराष्ट्र पोलिसांबद्दलचा आदर व्यक्त केला. "मुंबई आणि महाराष्ट्र पोलीस हे देशातील सर्वात कार्यक्षम पोलीस दल आहे. त्यांच्या प्रमुखाने केलेल्या विनंतीचा मान राखत ही डॉक्युमेंट्री हटवत आहे, " असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, जानेवारी २०२६ मधील सभेतील सादरीकरणाचा भाग पुन्हा शेअर करत हा विषय लोकांसमोर मांडत राहणार असल्याचेही राज ठाकरे यांनी सांगितले.

महाराष्ट्र माझ्या हातात कधी...

नो-पार्किंग असलेल्या फुटपाथवर काळ्या-लाल रंगाचे, तर पार्किंगच्या जागांवर पिवळ्या-काळ्या रंगाचे पट्टे रंगवण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुंबई महानगरपालिका आयुक्तांसमोर मांडल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. वारंवार सांगितल्यानंतर दादरमधील एका फुटपाथवर लाल पट्टे रंगवण्यात आले; मात्र नागरिकांना नियम पाळण्यास कोण सांगणार, असा सवाल त्यांनी केला. एखाद्या क्षेत्रफळाच्या सुमारे १५ टक्के भागात रस्ते असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पूर्वी ५० लोक राहत असलेल्या ठिकाणी आता ५०० लोक राहत आहेत; मात्र त्यांच्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था नाही. विकास होत असला तरी टाऊन प्लानिंग होत नसल्याने नियोजन कोलमडत असल्याचे ते म्हणाले. पोलिसांची वाहने आणि पायलट गाडी सोबत असतानाही आपल्या चालकांना सिग्नल न मोडण्याची ताकीद देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कितीही महत्त्वाचे काम असले तरी सिग्नल मोडायचा नाही, अशी सूचना आपण देत असल्याचे ते म्हणाले. वाहनांची नोंदणी वाढत असताना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कमकुवत होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. पुण्यात एक दिवस सर्वांनी वाहने रस्त्यावर आणली, तर वाहतूक ठप्प होईल, असे ते म्हणाले. नवी मुंबईत लाखो प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. रेल्वे व्यवस्था कोलमडल्यास आणि नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागल्यास घराबाहेर पडणेही कठीण होईल, असा इशारा त्यांनी दिला. शहरांमध्ये फुटपाथ, मैदाने आणि बागांसाठी जागा कमी होत असून, सर्वत्र टॉवर आणि कॉलन्या उभ्या राहत आहेत. पाणीपुरवठ्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. याला शिस्तबद्ध विकास म्हणायचे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विकासाचे आराखडे तयार करताना तज्ज्ञांचा सल्ला घेण्याऐवजी बिल्डरांशी जवळीक ठेवली जात असल्याने टाऊन प्लानिंगकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. "अशा गोष्टींना शिस्त लावणे हे रॉकेट सायन्स नाही. त्यासाठी फक्त इच्छाशक्ती लागते, " असे सांगत या प्रश्नांवर सरकारसमोर पुन्हा भूमिका मांडणार असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. तसेच, महाराष्ट्राची सत्ता आपल्या हातात कधी येणार, याची आपण वाट पाहत असल्याचे सांगत त्यांनी जनतेसमोर सत्तेची इच्छा व्यक्त केली.

स्पीडपोस्ट सेवेची व्याप्ती वाढली...

प्रत्येक मार्गिकेसाठी २८ नियुक्त टपाल कार्यालयांमध्ये बुकिंगची सुविधा असेल. ठाणे आणि नवी मुंबईतून बाहेर जाणाऱ्या १० मार्गिकांद्वारे या शहरांना मुंबई, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद, बेंगळुरू, दिल्ली, नाशिक, पुणे, नागपूर आणि अहमदाबादशी जोडण्यात येणार आहे. या मार्गिकांसाठी प्रत्येकी १२ नियुक्त टपाल कार्यालयांमध्ये बुकिंग स्वीकारले जाईल. याशिवाय, बाहेरून येणाऱ्या नऊ मार्गिकांमध्ये एनसीआर ते मुंबई, अहमदाबाद ते मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद, बेंगळुरू, अहमदाबाद ते ठाणे व नवी मुंबई आणि चेन्नई ते पुणे या मार्गांचा समावेश आहे. मुंबई-पुणे आणि मुंबई-अहमदाबाद या दोन नवीन पार्सल मार्गिका सुरू करण्यात आल्या आहेत. या मार्गिकांसाठी मुंबईतील २९ टपाल कार्यालयांमध्ये बुकिंग स्वीकारले जाईल. तसेच, पुण्यातील ३८ आणि अहमदाबादमधील पाच वितरण कार्यालयांद्वारे पार्सल वितरणाची सुविधा सुलभ होणार आहे. या दोन्ही मार्गिकांवर कागदपत्रांचे वितरणही केले जाणार आहे. किरकोळ आणि घाऊक ग्राहकांना नियुक्त बुकिंग कार्यालयांमधून २४ स्पीड पोस्ट सेवेचा लाभ घेता येईल. त्यामुळे ग्राहकांनी जवळच्या टपाल कार्यालयात या सेवेची उपलब्धता तपासून तिचा लाभ घ्यावा.

प्रमुख टपाल कार्यालये आणि सुविधा

• प्रमुख बुकिंग केंद्रे: विलेपार्ले बिझनेस पोस्ट सेंटर, वाशी, दादर, मुंबई जीपीओ आणि जेकब सर्कल पोस्ट ऑफिस.

• प्रमुख वितरण कार्यालये: कांदिवली पश्चिम, मालाड पूर्व, कांदिवली पूर्व, साकीनाका टपाल कार्यालय आणि आझादनगर टपाल कार्यालय.

टोरंट पॉवर प्रकल्पावरून राजकारण...

मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांकडून 'फेक नरेटिव्ह' पसरवले जात असल्याचा आरोप केला. हा प्रकल्प एका दिवसात मंजूर झालेला नसून, त्यासाठी १८ महिने सुनावणी झाल्यानंतर काम सुरू करण्यात आले आहे. संपूर्ण प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पडल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्पामुळे कोणाचीही उपजीविका नष्ट होणार नाही; अशी परिस्थिती उद्भवल्यास पुनर्वसनाचा योग्य विचार केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. महाराष्ट्रात उद्योगांची संख्या वाढत असल्याने विजेची मागणीही वाढणार आहे. ती पूर्ण करण्यासाठी स्वच्छ ऊर्जानिर्मिती आवश्यक असल्याचे फडणवीस म्हणाले. सौरऊर्जेची उपलब्धता असूनही संध्याकाळी पाच वाजल्यानंतर विजेची मागणी वाढते. त्या वेळी कोळशावर आधारित वीज वापरल्यास प्रदूषण वाढते, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकल्पातून तीन हजार मेगावॅट वीज निर्माण होणार असून, सुमारे ४० लाख वाहनांमधून होणाऱ्या उत्सर्जनाइतके उत्सर्जन टाळता येईल, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. प्रकल्पस्थळी तयार होणाऱ्या तलावातील पाणी सुमारे चार लाख लोकांच्या वर्षभराच्या गरजा भागवू शकेल, असेही ते म्हणाले. कंपनीने घेतलेल्या जमिनीच्या बदल्यात तीनपट जागा उपलब्ध करून दिल्याचे सांगत, त्या जागेवर ३० हजार आणि प्रकल्पस्थळी ६० हजार, अशी एकूण ९० हजार झाडे लावण्यात येणार असल्याचा दावा त्यांनी केला. हा प्रकल्प भीमाशंकर जंगलापासून १६ किलोमीटर आणि मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील, असेही ते म्हणाले. प्रकल्पाचे पर्यावरणीय परिणाम, वृक्षतोडीची परवानगी, स्थानिकांचा सहभाग आणि पुनर्वनीकरणाबाबतच्या दाव्यांवरून वाद कायम आहे. सरकार प्रकल्पाला स्वच्छ ऊर्जेसाठी महत्त्वाचा मानत असताना विरोधक आणि पर्यावरणप्रेमी वृक्षतोडीवर प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यामुळे कर्जत प्रकल्पावरील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

भूकमारीची चिंताजनक समस्या!

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. अन्नधान्य उत्पादनात भारताने मोठी प्रगती केली आहे. जगातील अनेक देशांना भारत अन्नधान्याचा पुरवठा करतो. मात्र, एवढी प्रगती होऊनही देशातील भूकमारी आणि कुपोषणाची समस्या कायम असणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. २०२६ च्या जागतिक भूक निर्देशांकाने पुन्हा एकदा या समस्येकडे देशाचे लक्ष वेधले आहे.जर्मनीची वेल्ट हंगर हिल्फे (Welthungerhilfe), स्विट्झर्लंडची हेल्वेटास आणि संबंधित संशोधन संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या २०२६ च्या जागतिक भूक निर्देशांकानुसार, १२२ देशांमध्ये भारताचा क्रमांक १०० वा आहे. भारताचा भूक निर्देशांक गुणांक २४.१ असून, भूकमारीच्या दृष्टीने भारताची स्थिती 'गंभीर' या श्रेणीत आहे. भारताची स्थिती अजूनही समाधानकारक नसल्याचे या अहवालातून स्पष्ट होते.या अहवालातील सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे बालकांचे कुपोषण. पाच वर्षांखालील बालकांपैकी सुमारे २९.३ टक्के बालकांची वाढ वयानुसार खुंटलेली आहे, तर १९ टक्के बालके उंचीच्या तुलनेत कमी वजनाची आहेत. देशातील सुमारे ९.८ टक्के लोकसंख्या कुपोषणग्रस्त आहे. तसेच पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यूचे प्रमाण २.७ टक्के आहे. ही आकडेवारी देशातील पोषणविषयक समस्येची गंभीरता अधोरेखित करते.एकीकडे भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. देशात मोठमोठे प्रकल्प उभे राहत आहेत, पायाभूत सुविधांचा विकास होत आहे आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही प्रगती होत आहे. मात्र, दुसरीकडे अनेक बालकांना पुरेसा आणि सकस आहार मिळत नसेल, तर या प्रगतीचा सर्वसामान्यांना कितपत लाभ होत आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. देशाचा विकास केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्न, मोठे उद्योग किंवा उंच इमारती यांवर मोजता येत नाही. देशातील प्रत्येक नागरिकाला पुरेसे अन्न, आरोग्य आणि शिक्षण मिळते की नाही, हेही विकासाचे महत्त्वाचे निकष आहेत.भूकमारी आणि कुपोषण दूर करण्यासाठी केवळ घोषणा करून चालणार नाही. सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्था, शालेय पोषण आहार, अंगणवाडी सेवा आणि मातृ-बाल आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. गरजू नागरिकांपर्यंत धान्य पोहोचते का, बालकांना योग्य पोषण मिळते का आणि सरकारी योजनांचा लाभ पात्र व्यक्तींना मिळतो का, याची नियमित तपासणी झाली पाहिजे. अन्नधान्याची नासाडी रोखणे, शेतमालाला योग्य भाव देणे आणि गरिबांच्या उत्पन्नात वाढ करण्यावरही भर द्यावा लागेल. जागतिक भूक निर्देशांकातील आकडेवारीकडे केवळ देशाची बदनामी म्हणून पाहून चालणार नाही. अशा अहवालांच्या पद्धतींबाबत मतभेद असू शकतात; मात्र देशातील कुपोषण आणि बालकांच्या पोषणाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या समस्येची कारणे शोधून त्यावर ठोस उपाययोजना करणे ही सरकारची जबाबदारी आहे.देशातील एकही नागरिक उपाशी राहू नये आणि एकाही बालकाला कुपोषणाचा सामना करावा लागू नये, हेच खऱ्या विकासाचे उद्दिष्ट असले पाहिजे. भूकमुक्त आणि कुपोषणमुक्त भारत घडविण्यासाठी सरकार, समाज आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

श्याम ठाणेदार

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८
Email :- centralmumbaice@mahapwd.gov.in ४९३६४०४/ २४९३११०२ फॅक्स २४९३११०२
जा.क्र. का.अ./ममुवि/निविदा/ ४२७० दिनांक :- १९/१०/२०२६

ई निविदा सूचना क्रमांक १९ सन (२०२६-२७)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून एकूण ३७ कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/ http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्था, मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

ई-निविदा उपलब्ध कालावधी -	दि.२३.१०.२०२६, सकाळी १०.०० पासून ते दि.३०.१०.२०२६ रोजी १७.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)	दि.०२.११.२०२६ रोजी १७.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८)

सही/-
कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग,
वरळी, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C३३५५

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

राखेतून उभे राहणार महाराष्ट्राचे महामार्ग

महानिर्मिती आणि MSRDC मध्ये ऐतिहासिक करार !

■ **मुंबई (राकेश गायकवाड) :** औष्णिक विद्युत केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या राखेचा शाश्वत वापर करून पर्यावरण संवर्धनासह राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासाठी महानिर्मिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारानुसार जानेवारी २०२७ ते डिसेंबर २०२८ या कालावधीत पूर्व महाराष्ट्रातील द्रुतगती मार्ग आणि खनिज वाहतूक मार्ग प्रकल्पांसाठी एकूण ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर करण्यात येणार आहे. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. आणि एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष



व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार बी. गायकवाड यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या उपक्रमांतर्गत महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांतील राखेचा वापर नागपूर–गोंदिया, भंडारा–गडचिरोली आणि नागपूर–चंद्रपूर द्रुतगती मार्गांसह नवेगाव मोरे–सुरजागड खनिज वाहतूक मार्गाच्या उभारणीत करण्यात येणार आहे. प्रस्तावानुसार नागपूर–गोंदिया द्रुतगती मार्गासाठी २.०९ कोटी मेट्रिक टन, भंडारा–गडचिरोली मार्गासाठी १.१४ कोटी मेट्रिक टन, नागपूर–चंद्रपूर मार्गासाठी २.७९ कोटी मेट्रिक टन आणि नवेगाव मोरे–सुरजागड खनिज वाहतूक मार्गासाठी ०.१५ कोटी मेट्रिक टन राखेची आवश्यकता निश्चित करण्यात आली आहे. प्रकल्पांच्या गरजेनुसार नागपूर परिसरातील कामांसाठी कोराडी किंवा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून, तर चंद्रपूर परिसरातील प्रकल्पांसाठी चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातून राख उपलब्ध करून दिली जाणार आहे. राखेचे प्रमाण, उचल वेळापत्रक, वाहतूक व्यवस्था, आर्थिक अटी आणि वापराचे नियोजन निश्चित करण्यासाठी संबंधित औष्णिक विद्युत केंद्र, एमएसआरडीसी आणि अधिकृत कंत्राटदार यांच्यात स्वतंत्र त्रिपक्षीय करार केले जाणार आहेत. राखेचे मोजमाप, वापराचे प्रमाणीकरण आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून आर्थिक सहाय्याशी संबंधित प्रक्रिया पूर्ण केली जाईल. राखेची वाहतूक, हाताळणी आणि वापर करताना पर्यावरणीय नियम, तांत्रिक मानके आणि वैधानिक तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या ३१ डिसेंबर २०२१ च्या राख अधिसूचनेनुसार राखेचा शंभर टक्के वापर आणि राज्य शासनाच्या १९ सप्टेंबर २०२५ च्या राख उपयोग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी हे या कराराचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या उपक्रमामुळे औष्णिक विद्युत केंद्रांतील जुन्या राखेचा मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर होऊन दीर्घकालीन साठवणुकीमुळे निर्माण होणारे पर्यावरणीय धोके कमी होतील, तसेच राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होईल. हा सामंजस्य करार ३१ मार्च २०३२ पर्यंत किंवा संबंधित प्रकल्प पूर्ण होईपर्यंत लागू राहणार असून, आवश्यकतेनुसार दोन्ही संस्थांच्या संमतीने त्याची मुदत वाढविता येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशासाठी स्वच्छ हवा कृती कार्यक्रम राबविणार – पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

■ **मुंबई (सम्यक कासारे) :** मुंबई आणि परिसरातील वायुप्रदूषण कमी करण्यासाठी रस्त्यांवरील धूळ नियंत्रण, बांधकामाचा मलबा वाहतूक आणि विल्हेवाट, औद्योगिक प्रदूषण तसेच वाहनांच्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येणार आहेत. रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी केवळ झाडलोट न करता व्हॅक्यूम क्लिनिंग यंत्रांचा वापर, स्प्रिंकलरद्वारे पाण्याची फवारणी आणि बांधकामाचा मलबा वाहून नेणाऱ्या वाहनांना पूर्णपणे झाकणे बंधनकारक करण्यावर भर देण्यात येईल. मुंबई महानगर प्रदेशासाठी स्वच्छ हवा कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून एकत्रित उपाययोजना आखण्यात येतील, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.मुंबई व परिसरातील हवा प्रदूषणासंदर्भात मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली



बैठक झाली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महापालिकांचे आयुक्त दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.बैठकीत सादर करण्यात आलेल्या माहितीचा संदर्भ देत मंत्री मुंडे यांनी रस्त्यांवरील धूळ आणि वाहनांमुळे पुन्हा हवेत मिसळणाऱ्या धुळीकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. प्रदूषणात या घटकांचा मोठा वाटा असल्याने रस्ते स्वच्छ करण्याच्या पद्धतीत बदल करावा लागेल. केवळ झाडूने धूळ एका बाजूला केल्याने प्रदूषण कमी होत नाही. त्यासाठी व्हॅक्यूम क्लिनिंग यंत्रांचा वापर वाढवावा. तसेच स्प्रिंकलरद्वारे पाण्याची फवारणी करताना प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्याच्या शक्यतेचा विचार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.महापालिकांनी हवा प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून घ्यावी. रस्त्यांची स्वच्छता, धूळ नियंत्रण आणि प्रदूषणाचे नियमित निरीक्षण यासाठी तांत्रिक उपायांचा अवलंब करावा.

फेरीमुक्त दादरसाठी पालिका ॲक्शन मोडमध्ये;

'पादचारी प्रथम' मोहिमेत १२ अतिक्रमणे आणि ६० फेरीवाल्यांवर हातोडा

■ **मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** पादचाऱ्यांना पदपथांवरून सुरक्षित आणि अडथळामुक्त मार्गक्रमण करता यावे, यासाठी मुंबई महानगरपालिकेने 'पादचारी प्रथम' (Pedestrian First) अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. या अभियानांतर्गत दादर पश्चिम येथील स्व. माँसाहेब मीनाताई ठाकरे फुल मंडई आणि सेनापती बापट मार्गालगतच्या पदपथांवरील अतिक्रमणांवर शुक्रवारी (२३ ऑक्टोबर) मोठी कारवाई करण्यात आली. या मोहिमेत पदपथांवर अडथळा निर्माण करणारी १२ अनधिकृत बांधकामे, तात्पुरती ताडपत्रीची शेड, अनधिकृत



कट्टे हटविण्यात आले, तसेच ६० अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या अभियानाचा उद्देश पदपथ अतिक्रमणमुक्त करून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि सुलभ सार्वजनिक जागा उपलब्ध करून देणे हा आहे. ही कारवाई मुंबई महानगरपालिकेच्या 'जी उत्तर' विभागामार्फत करण्यात आली. उपायुक्त (परिमंडळ-२) प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'जी उत्तर' विभागाचे सहायक आयुक्त योगेश देसाई यांच्या नेतृत्वात ही मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पुरेसा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, पदपथांवर अनधिकृत बांधकामे, शेड, साहित्य किंवा इतर कोणतेही अडथळे निर्माण करू नयेत. अशा प्रकारचे अतिक्रमण आढळल्यास भविष्यातही कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. शहरातील पदपथ पादचाऱ्यांसाठी सुरक्षित, मोकळे आणि वापरण्यायोग्य ठेवण्यासाठी 'पादचारी प्रथम' अभियान सातत्याने सुरू राहणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

पाइप गॅस जोडण्यांना गती; परवाने व शुल्क सवलतींना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ

■ **मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यात घरगुती पाइप गॅस (PNG) जोडण्यांचे काम वेगाने पूर्ण व्हावे, यासाठी राज्य सरकारने गॅस कंपन्यांना दिलेल्या विविध सवलतींची मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवली आहे. यामध्ये परवानग्या २४ तासांत देणे, काही शुल्क माफ करणे आणि २४ तास काम करण्याची परवानगी देणे अशा सवलतींचा समावेश आहे.राज्यातील स्वंयपाकाच्या गॅसच्या सुलभ वितरणासाठी पाइपद्वारे नैसर्गिक वायू (PNG) वितरणाला गती मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन (CGD) नेटवर्कचा जलद आणि वेगवान विस्तार करण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने ईज ऑफ डुइंग अंतर्गत परवाने देणे सुलभ केले असून काही परवान्यांच्या शुल्क माफीसह अनेक महत्त्वपूर्ण सवलती घोषित केल्या आहेत. गॅस कंपन्याना या सवलती यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत देण्यात आल्या होत्या. आता यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून आता या सवलती ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने जारी केला आहे.जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने एलपीजी उपलब्धतेवर मर्यादा येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात पाइपद्वारे नैसर्गिक वायू (PNG) जोडण्यांचा विस्तार गतीने करण्यासाठी नगर विकास विभागाने सर्व महापालिका व नगरपालिकांसाठी सूचना निर्गमित केल्या आहेत.शासनाच्या निर्णयानुसार, महानगरपालिका, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग आणि इतर प्राधिकरणांकडे पाइपलाइनसाठी प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर झालेल्या (Deemed Approval) समजण्यात येणार आहेत. तसेच नव्या परवानग्या केवळ २४ तासांत मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.याशिवाय, गॅस पाईपलाईन पुरवठ्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी तसेच विविध परवानग्यांसाठी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या ठिकाणी इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्या स्वतःच्या खर्चातून सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करू शकतील, त्यांना त्यासाठी परवानगी दिली जाणार असून आवश्यक हमीपत्र घेण्यात येणार आहे. तसेच ज्या ठिकाणी कंपन्यांना स्वतःच्या खर्चाने सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करुन देणे शक्य नसेल त्या ठिकाणी केंद्र शासनामार्फत दिलेल्या अधिसूचनेमधील विहित शुल्क भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तरुणांनी अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनावे; जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसनावर भर द्यावा – राज्यपाल

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पोलीस दलांच्या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीचा शुभारंभ

■ **मुंबई (गणेश बागडे) :** अमली पदार्थांचे व्यसन ही समाजापुढील, विशेषतः तरुण पिढीसमोरील गंभीर समस्या आहे. अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्याबरोबरच त्यांची मागणी कमी करण्यासाठी जनजागृती, प्रतिबंध, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनून जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसनावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'नशामुक्त भारत – फाईट अगेन्स्ट ड्रग्ज' या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीच्या शुभारंभप्रसंगी राज्यपाल बोलत होते. नरीमन पॉईंट येथे झालेल्या या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आणि राज्य राखीव





पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांच्यासह विविध राज्यांतील पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मोटारसायकल रॅलीला गुजरातकडे प्रस्थान देण्यात आले. विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांचे प्रतिनिधी तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व जवान या रॅलीत सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याबरोबरच तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे हा या रॅलीचा उद्देश आहे. ही रॅली गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पोहोचणार आहे.राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी विविध संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण घडवून आणण्यात ऐतिहासिक आणि निर्णायक भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सशक्त आणि एकसंध भारताचा पाया घातला गेला. राष्ट्रीय एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी आपण सदैव सतर्क राहिले पाहिजे.महाराष्ट्र पोलीस दल आपली कार्यकुशलता, समर्पण आणि उत्कृष्ट सेवेसाठी देशभरात ओळखले जाते. राज्यात शांतता, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच सुरक्षित व उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यात पोलिसांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.गडचिरोलीतील नक्षलवादी कारवाया नियंत्रणातही महाराष्ट्र पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गडचिरोली जिल्हा आता महत्त्वाचे पोलाद केंद्र म्हणून उदयास येत असून, तेथे विकासाच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अमली पदार्थांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी त्यांचा पुरवठा रोखण्याबरोबरच मागणी कमी करण्यावरही लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अमली पदार्थांची तस्करी रोखणे तसेच तस्कर आणि विक्रेत्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करणे ही जबाबदारी पोलीस आणि अमली पदार्थविरोधी यंत्रणांची आहे. मात्र, अमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठी संपूर्ण समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक असल्याचे सांगत राज्यपाल श्री. वर्मा यांनी अमली पदार्थ विरोधी कृतीदलाच्या कारवायांबाबत समाधान व्यक्त केले. महाविद्यालये आणि विद्यापीठांचे कुलपती या नात्याने महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये 'नशामुक्त भारत अभियान' हाती घेण्यात आले आहे.

प्रदूषण पसरवणाऱ्या बेकऱ्यांवर पालिकेचा थेट हातोडा

आता नोटीस नाही, थेट टाळे ठोकणार !

■ **मुंबई (नितीन देवळेकर) :** मुंबईतील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने हवा प्रदूषणात भर टाकणाऱ्या बेकऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील लाकूड आणि कोळशावर चालणाऱ्या बेकऱ्यांमुळे पीएम-१० प्रदूषणात सुमारे ३.५ टक्के भर पडत असल्याने अशा बेकऱ्यांना स्वच्छ इंधनावर रूपांतरित करण्यासाठी पालिकेने मोहीम हाती घेतली आहे. मात्र, वारंवार नोटिसा देऊनही अनेक बेकऱ्यांनी नियमांचे पालन न केल्याने आता अशा बेकऱ्या कोणतीही पूर्वसूचना न देता थेट बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी पालिकेने २०२४ मध्ये २८ मुद्द्यांची मार्गदर्शक तत्त्वे लागू केली असून, बांधकामस्थळांवरील नियमभंग, रस्त्यांवरील धूळ, कचरा जाळणे आणि राडारोड्याची अयोग्य विल्हेवाट यांसारख्या प्रकारांवरही कारवाई सुरू आहे. सध्या मुंबईतील एकूण ५९३ बेकऱ्यांपैकी ३५४ बेकऱ्या लाकूड व कोळशावर कार्यरत आहेत. त्यापैकी १७५ बेकऱ्यांनी स्वच्छ इंधनाचा स्वीकार केला असून ६९ बेकऱ्यांचे रूपांतर सुरू आहे. तसेच ८ बेकऱ्या बंद झाल्या असून ८७ बेकऱ्या अनधिकृतपणे सुरू असल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. स्वच्छ इंधनाचा



वापर वाढवण्यासाठी महापालिकेकडून जनजागृतीही केली जात आहे. मात्र, अनेक बेकरी चालकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात थेट बंदची कारवाई सुरू करण्यात आली आहे. पालिका अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून प्रदूषण कमी करण्यासाठी कठोर पावले उचलली जात आहेत. दुसरीकडे, पारंपरिक इंधनावरून स्वच्छ इंधनाकडे वळण्यासाठी बेकरीतील यंत्रणा व सुविधा बदलण्याचा खर्च सुमारे २० लाख रुपये येत असल्याचे बेकरी चालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अचानक व्यवसाय बंद झाल्यास आर्थिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. तरीही शहरातील हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी प्रदूषण करणाऱ्या बेकऱ्यांवर कठोर कारवाई अपरिहार्य असल्याची भूमिका महापालिका प्रशासनाने स्पष्ट केली आहे.

मुंबईतील कचरा साचण्याची संभाव्य ठिकाणे (GVP's) निष्कासित करण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना कराव्यात - अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा

■ **मुंबई (विशाल पाटील) :** सुका कचरा वर्गीकरण केंद्रांचे आधुनिकीकरण, बांधकाम व पाडकाम राडारोड्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचनाकचरा संकलन आणि वाहतुकीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रभावी यंत्रणा विकसित केली आहे. प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर या यंत्रणेचा तितक्याच प्रभावीपणे वापर करावा. कचरा साचण्याची संभाव्य ठिकाणे (Garbage Vulnerable Points – GVP's) निष्कासित करण्यासाठी प्रयत्न करावेत, बांधकाम व पाडकाम राडारोड्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक प्रभावी उपाययोजना कराव्यात कराव्यात, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी दिले आहेत. तसेच, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबईतील स्वच्छतेच्या बाबतीत दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यासाठी संपूर्ण प्रशासन कटिबद्ध आहे. या निर्देशांनुसार स्वच्छतेबाबत लवकरात लवकर दृश्य स्वरुपात बदल दिसायला हवे अशा उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाची आढावा बैठक डॉ. विपिन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली आज (दिनांक २३ ऑक्टोबर २०२६) वरळी येथील महानगरपालिकेच्या कमांड सेंटर येथे पार पडली. यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सह आयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांच्या मार्गदर्शनात, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर यांच्या देखरेखीत मुंबईतील



स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा घेऊन संबंधित कामांना गती देण्याबाबत निर्देश आज देण्यात आले.मुंबईतील स्वच्छता व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी संबंधित विभागांनी कामांचे नियमित निरीक्षण करावे, प्रलंबित उपाययोजनांचा आढावा घ्यावा आणि निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना डॉ. विपिन शर्मा यांनी या बैठकीत दिल्या. मुंबईतील कचरा साचण्याची संभाव्य ठिकाणे (GVP's) ओळखून त्यांचे नकाशांकन (Mapping) करणे, त्यावर सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे नियमित देखरेख ठेवणे आणि संबंधित प्रशासकीय विभागांनी (वॉर्ड) कचरा साचण्याच्या कारणांचे विश्लेषण करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. पहिल्या टप्प्यात मुंबईत एकूण २८६ कचरा साचण्याची संभाव्य ठिकाणे शोधण्यात आली आहेत. त्यापैकी १०२ ठिकाणे निष्कासित करण्यात आली आहेत. तथापि, कचरा साचण्याची ठिकाणे पुन्हा निर्माण होऊ नयेत, यासाठी वारंवार नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करावी, असे डॉ. शर्मा यांनी सांगितले.बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ५५ सुका कचरा वर्गीकरण केंद्रांपैकी (Dry Waste Segregation Centres) ४६ केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांत दररोज सुमारे १३७.३२ मेट्रिक टन सुका कचरा संकलित होतो. सुका कचरा संकलन, वर्गीकरण व पुनर्चक्रण प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी केंद्रांचे आधुनिकीकरण करण्यावर भर द्यावा. केंद्रांतील उपलब्ध सुविधा, कचरा हाताळणीची व्यवस्था आणि कचरा नोंदींची अचूकता यांचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश डॉ. विपिन शर्मा यांनी दिले.मुंबईत दररोज ८, ५०० मेट्रिक टनांपेक्षा अधिक बांधकाम व पाडकाम राडारोडा (C&D Waste) निर्माण होतो. या राडारोड्याच्या प्रक्रियेसाठी सध्या दोन प्रकल्पांमधून एकूण १, २०० मेट्रिक टन प्रतिदिन इतकी क्षमता उपलब्ध आहे. बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या राडारोड्याचे उगमस्थळी वर्गीकरण, अधिकृत पद्धतीने वाहतूक आणि योग्य प्रक्रिया सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

इंडिया ज्वेलरी पार्कमुळे महाराष्ट्र जागतिक दागिने उत्पादन व निर्यातीचे केंद्र बनेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महापे येथे 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' प्रकल्पाचा शुभारंभ

■ **ठाणे (तृप्ती गोरे) :** मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ, सुरक्षित औद्योगिक वातावरण आणि उद्योजकतेची परंपरा यांच्या बळावर महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील दागिने उत्पादन व निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्याची क्षमता आहे. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीशी जुळवून घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि शासन व उद्योग यांच्या समन्वयातून 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' हा प्रकल्प दागिने उद्योगाच्या भविष्यातील विकासाचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.नवी मुंबईतील महापे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' प्रकल्पाच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह, रत्न व आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी, उपाध्यक्ष शौनक पारिख आदी मान्यवर उपस्थित होते.मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ आणि व्यावसायिकतेची जागतिक स्तरावर ओळख आहे. रत्न व आभूषण उद्योगासाठी आवश्यक असलेले कुशल कारागीर, उद्योजकता, व्यापाराचे अनुभवसंपन्न जाळे आणि अनुकूल औद्योगिक वातावरण ही महाराष्ट्राची बलस्थाने आहेत. या सामर्थ्याचा उपयोग करून राज्याला जागतिक दागिने उद्योगातील महत्त्वाचे केंद्र बनविण्याची संधी इंडिया ज्वेलरी पार्कच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.जागतिक स्तरावरील बदलती परिस्थिती आणि अमेरिका व चीनसारख्या मोठ्या बाजारपेठांमधील घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत उद्योगांनी बदलत्या बाजारपेठांचा अभ्यास करून आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनातील नावीन्य आणि निर्यातीच्या नव्या संधींचा स्वीकार करणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्क या बदलांना सामोरे जाण्यासाठी दागिने उद्योगाला आधुनिक व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.महापे येथील २२ एकर क्षेत्रावर अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र विकसित करण्यात येत आहे.



हा प्रकल्प उद्योगाच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल. आजपासून ३० ते ४० वर्षांनंतर मागे वळून पाहताना इंडिया ज्वेलरी पार्कच्या उभारणीसाठी प्रयत्न करणाऱ्या उद्योग क्षेत्रातील नेतृत्वाचे निश्चितपणे स्मरण केले जाईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले.उद्योग उभारणीसाठी केवळ जमीन उपलब्ध करून देणे पुरेसे नसून, वीज, पाणी, रस्ते, भांडवल, पायाभूत सुविधा आणि विविध विभागांच्या परवानग्या वेळेत मिळणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्कच्या कामात कोणत्याही अडचणी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने मदत करावी. प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी शासन आणि उद्योग यांच्यातील समन्वय व भागीदारी महत्त्वाची आहे. उद्योगांच्या गरजा समजून घेऊन आवश्यक सुविधा आणि प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देण्याची शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा संकल्प केला आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी उत्पादन, निर्यात, रोजगारनिर्मिती आणि उद्योजकता यांची भूमिका महत्त्वपूर्ण असेल. भारत पाच ट्रिलियन अमेरिकी डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना महाराष्ट्रही एक ट्रिलियन अमेरिकी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. इंडिया ज्वेलरी पार्कसारखे प्रकल्प या आर्थिक वाटचालीला बळ देतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. इंडिया ज्वेलरी पार्क प्रकल्पामुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात एक लाख रोजगारांच्या संधी निर्माण होतील. महापे येथील २२ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणारे हे अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील रत्न व आभूषण उत्पादन, व्यापार आणि निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्यास महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.मुंबईच्या झवेरी बाजाराला रत्न व आभूषण व्यापाराचा समृद्ध इतिहास असून, बीकेसी येथील भारत डायमंड बोर्स आणि सीप्झसारख्या केंद्रांनी मुंबईला जागतिक हिरे व्यापार आणि दागिने निर्यातीच्या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले आहे. देशाच्या एकूण रत्न व आभूषण निर्यातीपैकी ५० टक्क्यांहून अधिक निर्यात महाराष्ट्रातून, विशेषतः मुंबईतून होते. या उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने जेम्स अँड ज्वेलरी धोरणाच्या माध्यमातून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, पाच लाख रोजगार निर्माण करणे आणि राज्यातील रत्न व आभूषण निर्यात दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

कर्तृत्ववान सहकाऱ्याच्या आठवणींना उजाळा; 'माझ्या आठवणीतील अर्चना' स्मृतीसोहळा संपन्न

कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकाऱ्यांनी जागवल्या दिवंगत अर्चना शंभरकर यांच्या आठवणी

■ **ठाणे (आकाश कांबळे) :** एखादी व्यक्ती काळाच्या पडद्याआड जाते; मात्र तिचे विचार, कर्तृत्व आणि माणसांशी जोडलेले ऋणानुबंध कायम स्मरणात राहतात. याच भावनेतून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दिवंगत अधिकारी कोकण विभाग माजी उपसंचालक अर्चना गाडेकर शंभरकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'माझ्या आठवणीतील अर्चना' हा हृद्य स्मृतीसोहळा शनिवारी खारघर येथील



उत्कर्ष हॉलमध्ये संपन्न झाला. श्रद्धांजली सभेच्या पारंपरिक स्वरूपापलीकडे जाऊन त्यांच्या सहवासातील आठवणी, व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आणि त्यांनी जपलेली माणुसकी यांना उजाळा देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अर्चना यांच्या आठवणींना उजाळा दिला. चंद्रपूर, नागपूर, मुंबई आणि नवी मुंबई येथील त्यांच्या परिचितांनी व्हिडिओ संदेश, आठवणी आणि प्रत्यक्ष उपस्थितीतून आपल्या भावना व्यक्त केल्या.

जनता दरबारामध्ये पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले नागरिकांच्या प्रश्नाचे निराकरण

■ **पालघर (रघुनाथ कदम) :** नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात राज्याचे वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत विविध विभागांच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाहीर आत्माराम पाटील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडलेल्या या जनता दरबारात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून एकूण १०५८ अर्ज



प्राप्त झाले आहेत.यावेळी खासदार आमदार राजेंद्र गावित, आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा पोलिस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष प्रकाश निकम, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी (सा. प्र) रणजित देसाई तसेच सर्व विभागाचे विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.जनता दरबारात महसूल, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, जमीनविषयक तक्रारी तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रश्न मांडण्यात आले.पालकमंत्री गणेश नाईक यांनी प्रत्येक अर्जदाराचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

खारबाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील CPHC प्रशिक्षणाचा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी घेतला आढावा

आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्यवर्धन आणि गुणवत्तापूर्ण प्राथमिक आरोग्य सेवांवर भर

■ **ठाणे (गणेश बागडे) :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care – CPHC) प्रशिक्षण कार्यक्रमाची ठाणे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care – CPHC) प्रशिक्षण कार्यक्रमाचा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी भिवंडी तालुक्यातील खारबाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.या भेटीदरम्यान डॉ. गंगाधर परगे यांनी प्रशिक्षणातील विविध विषयांची माहिती घेतली. प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये प्रत्यक्ष आरोग्य



सेवा देताना प्रभावीपणे वापरण्याचे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले. नागरिकांना त्यांच्या गावाजवळच वेळेत, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या नियोजन व समन्वयातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश प्राथमिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करणे हा आहे. या प्रशिक्षणामध्ये माता व बाल आरोग्य, किशोरवयीन आरोग्य, वृद्धांची काळजी, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, निदान व व्यवस्थापन, उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या आजारांची तपासणी, तसेच आरोग्यविषयक जनजागृती आणि समुपदेशन या महत्त्वपूर्ण बाबींवर भर दिला जातो.प्राथमिक आरोग्य स्तरावरच आजारांचे वेळेत निदान होऊन योग्य उपचार व आवश्यकतेनुसार पुढील आरोग्य संस्थेकडे संदर्भसेवा उपलब्ध झाल्यास गंभीर गुंतागुंत टाळण्यास मदत होते. यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण, कौशल्यवृद्धी आणि सेवांच्या गुणवत्तेत सुधारणा आवश्यक असल्याचे डॉ. परगे यांनी नमूद केले.CPHC प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवून ग्रामीण भागातील नागरिकांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा देण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य संस्थांमधील सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

नागपूर परिमंडलाच्या 'थलाई कुथल' नाटकाचा महावितरणच्या 'नाट्यबहार' स्पर्धेत प्रथम क्रमांक

■ **ठाणे (सम्यक कासारे) :** पुणे येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात आयोजित महावितरणच्या 'नाट्यबहार' या आंतरप्रादेशिक राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडलाच्या 'थलाई कुथल' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला आहे, तर कोल्हापूर परिमंडलाच्या 'समोरच्या घरात' या नाटकाला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत विविध सामाजिक विषयांवरील चार नाटकांचे सादरीकरण करण्यात आले.पारितोषिक वितरण समारंभास महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कार्यकारी संचालक परेश भागवत, अंकुर कावळे, सुनील काकडे आणि नागपूर प्रादेशिक संचालक राजेश नाईक, समन्वयक संजय ढोके,



प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर तसेच परीक्षक राज काझी, अजय धनवे, शुभांगी पाठक व राज कुबेर यांची उपस्थिती होती.मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार यांनी आव्हानात्मक परिस्थितीत दैनंदिन जबाबदारी सांभाळत कला जिवंत ठेवणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी अध्यक्षीय मनोगतात सर्व कलाकारांच्या सादरीकरणाची प्रशंसा केली. प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली पुणे परिमंडलाने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. प्रादेशिक संचालक सुनील काकडे यांनी प्रास्ताविक केले. सौ. मृदुला शिवदे व सौ. भक्ती जोशी यांनी सूत्रसंचालन केले, तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे यांनी आभार मानले. स्पर्धेत पहिल्या दिवशी 'ओल्या भिंती' व 'समोरच्या घरात', तर दुसऱ्या दिवशी 'वारी' व 'थलाई कुथल' ही नाटके सादर झाली. स्पर्धेच्या वैयक्तिक व तांत्रिक विभागात 'थलाई कुथल' नाटकासाठी प्रफुल्ल लांडे यांनी उत्कृष्ट दिग्दर्शन, सुजाता सोनटक्के यांनी प्रकाशयोजना, धर्मदीप फुलझेले यांनी पार्श्वसंगीत आणि समिधा लोहरे यांनी रंगभूषा व वेशभूषा या विभागांत प्रथम क्रमांक मिळवला. 'समोरच्या घरात' नाटकासाठी विठ्ठल पाटील यांनी नेपथ्य, जयतीर्थ सांगलीकर यांनी उत्कृष्ट अभिनेता आणि श्वेता सांगलीकर यांनी उत्कृष्ट अभिनेत्री या विभागांत प्रथम क्रमांक पटकावला.याशिवाय प्रिती फुले (नेपथ्य), आशिष मेहता (प्रकाशयोजना), दत्तात्रय भणगे (रंगभूषा व वेशभूषा), अमित बोकील (दिग्दर्शन) आणि असित रामटेके (उत्कृष्ट अभिनेता) यांना द्वितीय क्रमांक मिळाला. 'वारी' नाटकासाठी आशिष कासार यांना पार्श्वसंगीताचा द्वितीय क्रमांक, तर 'ओल्या भिंती' नाटकासाठी प्रणाली निमजे यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचा द्वितीय क्रमांक मिळाला. पौर्णिमा पुरोहित, दिपाली नरवडे, संगीता चव्हाण आणि प्रशांत मडावी यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड(प), मुंबई- ४०००८०
ई-मेल पत्ता: elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक:०२२-२५६०१३२७

ई-निविदा सुचना क्र. ३७/ २०२६-२७

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचेकडून खालील कामाकरीता ब-१ टक्केवारी नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नांव	निविदा रक्कम रुपये
१) अंदाजपत्रक क्र. १२३३७६/२०२६-२७ मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई येथील नवीन व्याख्यान संकुल इमारत (तळमजला + पहिला मजला) मधील विद्यमान जुन्या, कालबाह्य विद्युत प्रतिष्ठापनांचे नूतनीकरण करणे.	₹ १८,४५,२९३.००
२) अंदाजपत्रक क्र. २१३२२३/२०२६-२७ कुर्ला विभाग, मुंबई अंतर्गत अनिवासी इमारती आणि सर्व निवासी इमारतींमधील विद्युत प्रतिष्ठापनांच्या देखभालीसाठी ६ वायरमन आणि ३ अकुशल कामगार भाड्याने देण्याची सेवा पुरवणे (६ महिन्यांसाठी).	₹ १९,३८,६००.००
३) अंदाजपत्रक क्र. १२३३७०/२०२६-२७ मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई येथील जीवन विज्ञान इमारतीच्या (जी+३) दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील विद्यमान जुन्या, कालबाह्य विद्युत प्रतिष्ठापनांचे नूतनीकरण करणे.	₹ २१,९९,४४१.००
४) अंदाजपत्रक क्र. २१३२११/२०२६-२७, प्रकल्प, इमारत क्र. १, सीटीएस क्र. ६२७, चुनाभट्टी, मुंबई २२ येथील जॉन्सन बनावटीच्या लिफ्ट क्र. २ आणि लिफ्ट क्र. ४, १० प्रवासी (जी+११), जॉन्सन बनावटीच्या, जी+१० (११ थांबे आणि ११ मजले) च्या जुन्या, दुरुस्त न होणाऱ्या भागांची दुरुस्ती करणे (३६ महिने).	₹ ८,७५,८४६.००
५)अंदाजपत्रक क्र. OW/AESD/ADR/५२३/२०२२-२३ राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या उपकेंद्र डिजिटल ग्रंथालय, चाकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई येथे विद्युत स्थापनेचे नूतनीकरण आणि विद्यमान स्प्लिट टाईप एसी युनिट्स, जुने सबमर्सिबल वॉटर पंप तसेच संबंधित उपकरणांच्या बदलीची तरतूद करणे.	₹ ३०,५३,२४२.००
६) अंदाजपत्रक क्र. १२३२०९/२०२६-२७ न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा संचालनालय, मुख्य इमारत कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई येथील खोली क्र. ३०२, ३०३, ३०५, ३०६, ३०७, ३०९, ३१२, ३१५ मधील जुन्या, नादुरुस्त स्प्लिट टाईप वातानुकूलन युनिट्सच्या बदलीची तरतूद करणे.	₹ १६,५२,३७७.००
७) अंदाजपत्रक क्र. २१२२१९/२०२६-२७ घाटकोपर विभाग, घाटकोपर, मुंबई अंतर्गत अनिवासी इमारती आणि सर्व निवासी इमारतींमधील विद्युत प्रतिष्ठापनांच्या देखभालीसाठी ८ वायरमन आणि २ अकुशल कामगार भाड्याने देण्याची सेवा पुरवणे (६ महिन्यांसाठी).	₹ ११,१४,४३२.००
८) अंदाजपत्रक क्र. १२३२५५/२०२६-२७: मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई येथील जवाहरलाल नेहरू ग्रंथालय इमारतीच्या (जी+स्टिल्ट+१) तळमजल्यावरील (ग्राउंड फ्लोअर) आणि स्टिल्ट मजल्यावरील जुन्या व कालबाह्य झालेल्या विद्युत प्रणालीचे नूतनीकरण करणे.	₹ ५८,२८,८६२.००
९) अंदाजपत्रक क्र. २१२२१८/२०२६-२७, इमारत क्र. १०, PWD कंपाऊंड प्लॉट क्र. १९४B घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर पूर्व मुंबई येथे स्थापित इमारत क्र. १, कोन मेक G+२१ (२२ थांबे आणि २२ लँडिंग) च्या आधुनिकीकरणासाठी.	₹ ९,१८,३७५.००
१०) अंदाजपत्रक क्र. OW/AESD/KDL/२३६६६/२०२३-२४ दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील सिटी सिव्हिल अँड सेशन कोर्ट (बोरीवली विभाग) च्या G+६ मजली इमारतीसाठी, ८ प्रवासी / ५४४ किलो क्षमतेची इलेक्ट्रिक ट्रॅक्शन लिफ्ट (लिफ्ट क्र. १) पुरवणे आणि बसवणे (जुनी लिफ्ट बदलून नवीन बसवणे).	₹ १९,४७,७०५.००
११) अंदाजपत्रक क्र. १२३२१०/२०२६-२७, मुख्य इमारत आणि न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा संचालनालय, मुख्य इमारत, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई येथील खोली क्रमांक २०२, २०५, २०६, २०७ आणि २१४, ३१६, ३१८ मधील जुन्या, नादुरुस्त स्प्लिट टाईप वातानुकूलन युनिट्सच्या बदलीसाठी.	₹ ११,३३,९०९.००
१२) अंदाजपत्रक क्र.१२३२१७/२०२६-२७ मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई येथील प्रस्तावित शंकरराव चव्हाण सभागृह येथे सुरू असलेल्या स्थापत्य नूतनीकरण कामामुळे बाधित झालेल्या विद्यमान विद्युत प्रणालीचे नूतनीकरण करणे.	₹ ६५,६२,५५९.००
१३) अंदाजपत्रक क्र. २१२२१७/२०२६-२७ इमारत क्र. १०, सार्वजनिक बांधकाम विभाग कंपाऊंड, प्लॉट क्र. १९४बी. घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर पूर्व, मुंबई येथे स्थापित, कोन मेक जी+२१ (२२ थांबे आणि २२ लँडिंग) लिफ्ट क्र. २ चे आधुनिकीकरण करणे.	₹ ९,१८,३७५.००
१४) अंदाजपत्रक क्र.१२३२१९/२०२६-२७ मुंबई विद्यापीठ, कलिना, मुंबई येथील क्रीडा संकुलात सुरू असलेल्या स्थापत्य नूतनीकरण कामामुळे प्रभावित झालेल्या विद्यमान विद्युत प्रणालीचे नूतनीकरण करणे.	₹ २४,९९,८८३.००
१५) अंदाजपत्रक क्र.१२२२०८/२०२६-२७ प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे असलेल्या जुन्या खराब झालेल्या डीजी सेटच्या जागी नवीन सेट बसवणे.	₹ ४१,१४,०४७.००
१६) अंदाजपत्रक क्र. २१३२०९/२०२६-२७ प्रशासकीय इमारत क्र. १, चेंबूर पूर्व, मुंबई येथे बसवण्यात आलेल्या मार्कोनी मेक च्या २ नगांच्या, १० प्रवासी क्षमता असलेल्या (तळमजला +४ वरील मजले - G+४) लिफ्टच्या जुन्या व दुरुस्ती न करता येण्याजोग्या भागांची दुरुस्ती/बदली करणे. (दुसरी मागणी)	₹ ११,४१,४८७.००
१७) अंदाजपत्रक क्र. SR/NMED/MSSD/NMS/241203/2026-27, न्यू महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे बसवण्यात आलेले जुने व दुरुस्ती न करता येण्याजोगे फ्लशिंग वॉटर ट्रान्सफर पंप (Flushing Water Transfer Pump) आणि संप पंप (Sump Pump) सर्व संबंधित सुट्या भागांसह (Allied Accessories) बदलून नवीन पुरवणे. (दुसरी मागणी)	₹ १५,८४,७०६.००
१८) अंदाजपत्रक क्र. २२३२११/२०२६-२७ वांद्रे (पूर्व), मुंबई येथील प्रशासकीय इमारतीत लिफ्ट चालवण्यासाठी लिफ्ट ऑपरेटरची तात्पुरती सेवा पुरवणे. (दुसरी मागणी)	₹ ९,७७,१८४.००
१९) अंदाजपत्रक क्र.२१२२०९/२०२६-२७ घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई-८९ येथील पीडब्ल्यूडी संकुलातील इमारत क्र. ४ (प्लॉट क्र. १९४ बी) मध्ये बसवलेल्या 'कोने' कंपनीच्या ४ इलेक्ट्रिक पॅसेंजर लिफ्ट्ससाठी (G+२१; २२ थांबे व २२ लँडिंग्ज) पूर्णतः सर्वसमावेशक वार्षिक देखभाल सेवा पुरवणे (कालावधी: ३६ महिने). (दुसरी मागणी)	₹ २५,०७,५२०.००
२०) अंदाजपत्रक क्र.२२३२१२/२०२६-२७ वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ येथील वांद्रे उपविभागांतर्गत 'बीकेसी' विभागातील विद्युत यंत्रणेच्या देखभालीसाठी ६ महिन्यांच्या कालावधीकरिता ८ वायरमन आणि ५ अकुशल कामगारांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करणे. (दुसरी मागणी)	₹ २४,०३,०२४.००
२१) अंदाजपत्रक क्र. २१२२१०/२०२६-२७ घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई-८९ येथील पीडब्ल्यूडी संकुलातील इमारत क्र. ५ (प्लॉट क्र.१९४ बी) मध्ये बसवलेल्या 'कोने' कंपनीच्या ४ इलेक्ट्रिक पॅसेंजर लिफ्ट्ससाठी (G+२१; २२ थांबे व २२ लँडिंग्ज) पूर्णतः सर्वसमावेशक वार्षिक देखभाल सेवा पुरवणे (कालावधी: ३६ महिने). (दुसरी मागणी)	₹ २५,०७,५२०.००
२२) अंदाजपत्रक क्र. २२१२१९/२०२६-२७ वांद्रे (पूर्व), मुंबई येथील वांद्रे (BND) विभागांतर्गत येणाऱ्या अनिवासी आणि सर्व निवासी इमारतींमधील विद्युत यंत्रणेच्या देखभालीसाठी ६ महिन्यांच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात वायरमन आणि अकुशल कामगार पुरवणे. (६ महिन्यांसाठी) (दुसरी मागणी)	₹ १६,८०,१२०.००

ई-निविदा विक्रीचा कालावधी: दि. २७ / १० / २०२६ ते दि. ०३/ ११ / २०२६ रोजी संध्या. १७.३० पर्यंत.
ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ: दि. ०६ / ११ / २०२६ रोजी दुपारी १५.०० नंतर.
(महाराष्ट्र शासन, सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दि.१४.०२.२०२५)
वरील निविदा रक्कमेत जी.एस.टी. समाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस.टी.वगळून दर नमूद करावा. निविदा रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी. १८% पर्यंत बेगळा अदा करण्यात येईल.
१. https://mahatenders.gov.in या शासकीय संकेतस्थळावर ई-निविदाची माहिती उपलब्ध आहे.
२. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेले आहे.
३. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईवरती कळविण्यात येईल.
जा.क्र.काअ/उमुविवि/निविदा/ ३४२१ / २०२६ दिनांक: १६ / १० / २०२६

(सं.स. पुंगारी)
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा. बां. विभाग, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C३३८९

रायगडातील ७२१ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा दिलासा!

अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची चौथी यादी जाहीर; ११ हजार १४५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरणासाठी अर्ज

■ **रायगड (सचिन कदम) :** रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत ७२१ शेतकऱ्यांची चौथी यादी २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ११ हजार १४५ शेतकऱ्यांच्या याद्या आधार प्रमाणीकरणासाठी जाहीर करण्यात आल्या आहेत. पात्र शेतकऱ्यांनी संबंधित यादीत आपले नाव तपासून नजीकच्या महा-ई-सेवा केंद्र किंवा कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड-अलिबाग, तनवीर पाटील यांनी केले आहे.महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही कर्जमुक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्जासह पुनर्गठित व फेरपुनर्गठित कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.या योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. रायगड जिल्ह्यातील विविध बँकांनी योजनेच्या पोर्टलवर एकूण १२ हजार ७४ थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. या माहितीची संगणकीय प्रक्रियेद्वारे छाननी केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या याद्या



टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत. आता चौथ्या यादीत ७२१ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.चौथ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांची नावे संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायती येथे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी या यादीत आपले नाव तपासावे. तसेच, ३१ मार्च २०२६ रोजीची कर्जाची थकबाकी पडताळून पाहिल्यानंतर आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या संबंधित कर्जखात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.या योजनेच्या यादीत एकापेक्षा अधिक बँकांकडून पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश आहे. काही राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांच्या प्रकरणांत ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या 'हेअर कट' धोरणानुसार संबंधित कर्ज निरंक करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आणि इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. योजनेतील पात्र मृत, वयोवृद्ध तसेच बोटांचे ठसे नोंदविण्यात अडचण येणाऱ्या लाभार्थ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळावा, यासाठी १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली (एसओपी) निर्गमित करण्यात आली आहे. त्यामुळे अशा लाभार्थ्यांनाही नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घेता येणार आहे.जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीच्या यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी आणि योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड-अलिबाग, तनवीर पाटील यांनी केले आहे.

५१७ जणांच्या सामूहिक शंखनादाने नाशिकच्या नावे इतिहास; अमेरिकेचा ३०३ शंखवादकांचा विक्रम मोडला



३१ ऑक्टोबरला ध्वजारोहण; सिंहस्थ पर्वाच्या तयारीला गती

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक येथील रामकुंडावर दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. त्र्यंबकेश्वर येथेही त्याच वेळी ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी उत्साहाने पुढे यावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. महाजन यांनी केले.

■ **नाशिक (गणेश बागडे) :** "अभिनंदन! तुम्ही एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे!" गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग यांनी ही घोषणा करताच गोदावरीचा पवित्र तीर 'भारत माता की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. अमेरिकेचा एकाच वेळी ३०३ जणांनी शंखनाद करण्याचा पूर्वीचा विक्रम मागे टाकत ५१७ व्यक्तींनी सामूहिक शंखनाद केल्याने नाशिकच्या नावे एका ऐतिहासिक कामगिरीची नोंद झाली. भक्ती, श्रद्धा, सामूहिक शक्ती आणि भारतीय संस्कृतीचा गौरव अधोरेखित करणाऱ्या या सोहळ्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या मंगल पर्वाची आध्यात्मिक नांदी ठरली. नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण आणि अनंत विजय शंखनाद पथक यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागरी पौर्णिमेच्या पावन पर्वावर यशवंत महाराज पटांगण, गोदाकाठ येथे या सामूहिक शंखनादाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उपक्रमात शंखनादाच्या निनादाने परिसरात चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले. गोदावरीच्या तीरावर एकाच वेळी घुमलेल्या शंखध्वनीने नाशिकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवित सिंहस्थ कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी नागरिकांमध्ये उत्साह निर्माण केला. या वेळी महापौर हिमगौरी आडके आहेर, आमदार राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, नियोजन विभागाचे उपायुक्त योगेंद्र चौधरी, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग, समन्वयक मिलिंद बेर्लेकर, अनंत विजय शंखनाद पथकाच्या वृषाली घोलप आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांच्यासह साधू-महंत, शंखनाद वादक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामूहिक शंखनादाचा विक्रम प्रस्थापित झाल्यानंतर पालकमंत्री श्री. महाजन यांनी सहभागींचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हा उपक्रम केवळ नाशिक किंवा महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून, देशाच्या लौकिकात भर घालणारा आहे. अशा उपक्रमांमधून भारतीय संस्कृती, आध्यात्मिक परंपरा आणि सामूहिक सहभागाची ताकद जगासमोर येते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.शंखनाद हा भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. मंगलकार्य, धार्मिक विधी आणि आध्यात्मिक उपासनेमध्ये शंखनादाला विशेष महत्त्व आहे. अशा परंपरेला विश्वविक्रमाची जोड देण्याचा प्रयत्न नाशिकमध्ये साकार झाला. शेकडो नागरिकांनी एकाच वेळी शंखनाद करण्यासाठी दाखविलेली तयारी, शिस्त आणि उत्साह ही या उपक्रमाची वैशिष्ट्ये ठरली. सर्व सहभागींचे योगदान कौतुकास्पद असल्याचे पालकमंत्री महाजन यांनी नमूद केले.कार्यक्रमादरम्यान गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग यांनी विश्वविक्रम नोंदविण्याच्या प्रक्रियेची माहिती दिली. एकाच वेळी सर्वाधिक व्यक्तींनी शंखनाद करण्याचा यापूर्वीचा विक्रम ३०३ व्यक्तींचा होता. तो मोडण्यासाठी निर्धारित नियमांनुसार त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी शंखनाद करणे आवश्यक होते. या उपक्रमासाठी ५०० हून अधिक जणांनी नोंदणी केली होती. सहभागींच्या नोंदी, प्रत्यक्ष सहभाग आणि निर्धारित निकषांनुसार केलेल्या कामगिरीची पडताळणी दोन निरीक्षकांकडून करण्यात आली.शंख वाजविणे ही केवळ धार्मिक कृती नसून त्यासाठी श्वसनावर नियंत्रण, नियमित सराव, प्राणायाम आणि शारीरिक क्षमता आवश्यक असते. त्यामुळे मोठ्या संख्येने सहभागींचा समन्वय साधून सामूहिक शंखनाद करणे हे आव्हानात्मक काम होते. नाशिकमध्ये या उपक्रमासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित एकजुटीचे दर्शन घडविले. सामूहिक प्रयत्नांतून साध्य झालेल्या या कामगिरीमुळे नाशिकच्या सांस्कृतिक ओळखीला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली.आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री श्री. महाजन यांनी नागरिकांना या ऐतिहासिक पर्वाच्या तयारीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ शासनाचा, प्रशासनाचा, लोकप्रतिनिधींचा किंवा पोलिसांचा कार्यक्रम नसून प्रत्येक नाशिककराचा सोहळा आहे. आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्यांचे ज्या आपुलकीने स्वागत केले जाते, त्याच भावनेने कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाचा सन्मान केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

पदवीधर-शिक्षक निवडणुकीत पाकिटांतील रकमांच्या वाटपाची चर्चा

■ **सातारा (धनश्री सट्टा) :** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाची निवडणूक शांततेत पार पडली. या निवडणुकीत शिक्षक मतदार संघात मतदारांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप दस्तूर खुद्द शिवसेना शिक्षक मतदार संघातील शिवसेना पुरस्कृत उमेदवार सचिन सानप व शिक्षक पंधरा हजार रुपये घेतात. असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. तर साताऱ्यात पक्ष प्रेमी निष्ठावंत काही कार्यकर्त्यांनी मतदारांना देण्यासाठी आलेल्या पाकिटातील रकमेतून जी.एस.टी. कापण्याची चर्चा सुरू झालेली आहे. याला अद्यापही कोणी दुजोरा दिला नाही. ही अफवा असू शकते. असं दबक्या आवाजात सांगितले. याबाबत माहिती अशी की, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघांमध्ये अटीतटीची निवडणूक झाली. मोठ्या प्रमाणात शिक्षक व पदवीधर मतदार संघामध्ये उमेदवार उभे राहिले होते. प्रत्यक्षात दुरंगी व तिरंगी लढत होती. शिक्षक मतदार संघात ९४५४ मतदारांसाठी ४४ मतदान केंद्र होते व पदवीधर मतदार संघात ४७४६३ मतदारांसाठी ९३ मतदान केंद्र होते. साठी शिक्षक मतदार संघात १०८ व पदवीधर मतदार संघात ३८५ मतपेटी होत्या. लोकशाहीच्या आचारसंहितेप्रमाणे निवडणूक प्रक्रिया व्हावी. यासाठी मतदान अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली होती. अत्यंत पारदर्शकरित्या मतदान प्रक्रिया पार पाडल्याबद्दल अनेकांनी जिल्हा निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. लोकशाहीमध्ये आचारसंहितेचे पालन केल्याबद्दल प्रत्येकांना स्वतंत्र पुरस्कार द्यावा अशी मागणी केली. याचवेळी मतदारांना खुश करण्यासाठी शिक्षक मतदार संघात दहा हजार व पदवीधर मतदारांसाठी तीन हजार रुपयाची पाकीट तयार करण्यात आली होती. तसा निरोपही देण्यात आला. प्रचार यंत्रणेत सक्रिय सहभाग झालेल्या काही राजकीय पक्षाचे पदाधिकारी व लोकांशी



संपर्क असलेल्या कार्यकर्त्यांसाठी गोपनीय वाटप समिती तयार केली होती. शासन दरबारी वस्तू सेवा कर भरावा लागतो. याच धर्तीवर आपण राजकीय पक्षाचे काम करत असल्याने आपल्यालाही सेवेचा मेवा मिळाला पाहिजे. तो काहींनी रक्कम भरलेल्या बंद पाकीट मधील स्टेपलरची पिन काढून सेवा कर काढून घेतला होता. नवलाईची गोष्ट म्हणजे काहींना रिकामी पाकीटच मिळाली होती. याबाबत तक्रार केल्यास आपली बदनामी होईल. म्हणून कोणीही तक्रार केली नाही. मात्र त्याची चांगलीच चर्चा होऊ लागलेली आहे. सातारा जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रामध्ये शिक्षक व पदवीधर यांना मतदानाबाबत माहिती देण्यासाठी आठवी नापास कार्यकर्ते उत्साहाने पक्षाच्या तात्पुरत्या बुथवर बसून सक्रिय सहभाग घेत होते. काहींच्या तर शाळा सोडल्याच्या दाखल्यावर सतत गैरहजर असल्यामुळे शाळेचे नाव कमी केले आहे. असा शेरा असणारी काही मंडळी सुद्धा या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. सातारा जिल्ह्यातील पदवीधर मतदारसंघात ६७ टक्के व शिक्षक मतदार संघात ९० टक्के मतदान झाले. काल झालेल्या जिल्ह्यातील १३७ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली. अनेक मतदान केंद्राला भेटी देऊन नेत्यांनी आढावा घेतला. दोन दिवसांपूर्वीच पदवीधर व शिक्षक मतदारांसाठी बंद पाकिटात लिफाफ्यात संदेश गेला होता. हा संदेश हस्ते पर हस्ते पोचवण्यासाठी यादी तयार

आर्थिक व्यवहारांच्या आरोपांनी खळबळ

केली होती. त्याप्रमाणे जबाबदारी देण्यात आली होती. मतदान केंद्राच्या अवतीभवती चांगल्या पद्धतीने जबाबदारी पार पाडण्यासाठी अनेक जण उत्सुक होते. लोकशाही वाचवण्यासाठी आपला हातभार लागला आहे असं त्यांच्या चेहऱ्यावर भाव होता. परंतु काहींनी तळे राखे तो पाणी चाके याची कृतीतून आठवण करून दिली. सदरच्या घटनेबाबत वरिष्ठ नेत्यांपर्यंत काही प्रामाणिक व कर्तव्यदक्ष मतदारांनी माहिती घेऊन संदेश पोहोचवला आहे. आता त्याबाबत अशा कार्यकर्त्यांना नक्कीच विचारणा होईल. यामध्ये पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा कोणताही सहभाग नाही. उलट त्यांनी पदरमोड करून या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कुणाचेही मनात शंका नाही. उलट त्यांच्यामुळे खऱ्या अर्थाने ही निवडणूक शांततेत पार पडली असा दावा केला जात आहे. परंतु काहींनी या प्रक्रियेमधून आपला दिवाळीचा हिस्सा काढून घेतल्याची चर्चा वेगाने सुरू आहे. सदर घटनेबाबत पुरावा ठेवण्याची सुताराम शक्यता नव्हती. कारण दबंग पिक्चर सारखे मुजरिम भी हम. गवाई भी हम. कोर्ट भी हम. अशी सर्वांचेच युती झाली होती. त्यामुळे प्रामाणिकपणाने मतदार करणाऱ्यांना मतदान केल्यानंतर फक्त बोटावरती शाही लागल्याचे भाग्य लाभले आहे. दरम्यान, या सर्व प्रकरणाबाबत वरिष्ठ नेत्यांनी गंभीर दखल घेतली असून लवकरच निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर कमी जास्त प्रमाणात झालेल्या मतदानातून काही गोष्टी स्पष्ट होणार आहेत. काहींची झाडाझडती घेतली जाणार आहे. तोपर्यंत अफवावर विश्वास ठेवायचा का नाही? हे प्रत्येकाने ठरवावे. असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

वसई-विरारमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पालिकेचा पुढाकार;'नमस्ते' योजनेतून मोफत पीपीई किट आणि विमा वाटप

■ **विरार (सुचिता देशमुख) :** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'नमस्ते' (नॅशनल ॲक्शन फॉर मेकनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टिम) योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, शुक्रवारी राज्य व्यवस्थापकांनी या योजनेचा आढावा घेतला. गटारे आणि सेप्टिक टाक्यांची धोकादायक मानवी सफाई पूर्णपणे बंद करून स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षित, सन्मानजनक आणि यांत्रिकीकरणावर आधारित कामाची व्यवस्था उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय तसेच गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने देशभरात ही योजना राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य व्यवस्थापक प्रियांका



गांगुर्डे यांनी २३ ऑक्टोबर रोजी वसई-विरार महापालिकेला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नोंदणी, त्यांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, सुरक्षा उपाययोजना आणि योजनेच्या विविध घटकांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर बंधनकारक करण्याबरोबरच कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि सन्मानजनक कार्यपरिसर निर्माण करण्याबाबतही अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे धोकादायक कामाच्या पद्धतींना आळा बसून स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या दौऱ्यादरम्यान राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या वैयक्तिक सुरक्षा साधनांचे (पीपीई) स्वच्छता कर्मचाऱ्यांना वितरण करण्यात आले. वसई-विरार महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त अर्चना दिवे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. वितरित करण्यात आलेल्या सुरक्षा किटमध्ये स्वच्छता कामासाठी आवश्यक असलेली विविध संरक्षण साधने समाविष्ट असून, सर्व कर्मचाऱ्यांनी कामाच्या स्वरूपानुसार त्यांचा नियमित वापर करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'नमस्ते' योजनेमुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार असून त्यांच्या कामातील जोखीम मोठ्या प्रमाणात कमी होईल. याशिवाय या योजनेअंतर्गत सफाई कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. केंद्र सरकारकडून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला ₹५ लाखांचा विमा संरक्षणही देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असल्याचा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

अखेर पिंपरीतील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास!

महापालिका १०० ठिकाणी उभारणार 'फेरीवाला क्षेत्र'



■ **पुणे (अकिल शेख) :** पिंपरी-चिंचवड शहरातील पदपथ आणि रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासोबतच फेरीवाल्यांना अधिकृत व्यवसायाची ओळख मिळावी यासाठी महापालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सन २०२२ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांना प्रमाणपत्र आणि ओळखपत्रांचे वाटप सुरू करण्यात आले असून, त्यामुळे चार वर्षांपासून रखडलेली फेरीवाला क्षेत्र निर्मितीची प्रक्रिया अखेर मार्गी लागली आहे. सर्वोच्च न्यायालयाने पात्र फेरीवाल्यांना प्रमाणपत्रे व ओळखपत्रे वितरित करून नियोजित फेरीवाला क्षेत्रे निश्चित करण्याचे आदेश दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील दहा प्रभागांमध्ये ही मोहीम सुरू केली आहे. 'अ' आणि 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सहायक आयुक्त अजिंक्य येळे आणि निवेदिता घार्गे यांच्या हस्ते पात्र फेरीवाल्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यापूर्वी २०१२, २०१४ आणि २०१६ मध्येही फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाले होते, मात्र त्यानंतर फेरीवाला क्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. २०२२ च्या सर्वेक्षणात शहरात १९ हजार ७९२ फेरीवाले असल्याचे समोर आले होते. कागदपत्रांच्या छाननीनंतर १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले, मात्र त्यांना प्रमाणपत्रे व ओळखपत्रे देण्याची प्रक्रिया रखडली होती. दरम्यान, अनधिकृत टपऱ्या, पथाऱ्या आणि हातगाड्यांवर महापालिकेकडून सुरू असलेल्या कारवाईविरोधात तसेच पथविक्रेता कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, फेरीवाला क्षेत्र निश्चिती आणि पात्र फेरीवाल्यांना ओळखपत्रे देण्याच्या मागणीसाठी फेरीवाला महासंघाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर आता प्रमाणपत्र वितरणास गती मिळाली आहे. शहरातील दहा प्रभागांमध्ये फेरीवाला क्षेत्रासाठी सुमारे १०० जागा निश्चित करण्याचा प्रस्ताव असून, प्रत्येक प्रभागात दहा ठिकाणी अधिकृत फेरीवाला क्षेत्र विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. फेरीवाला क्रांती महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते यांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने फेरीवाल्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे सांगितले. प्रमाणपत्र आणि ओळखपत्रामुळे नोंदणीकृत व्यवसायाला अधिकृत मान्यता मिळणार असून, भविष्यात कारवाईची भीती कमी होईल, असे त्यांनी नमूद केले. भूमी जिंदगी विभागाचे उपायुक्त सीताराम बहुरे यांनी मंगळवारपर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्याचे नियोजन असून, फेरीवाला क्षेत्रासाठी जागा निश्चित करण्याचे कामही अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली.

रायगडात ५ हजार वनराई बंधाऱ्यांचे लक्ष्य

महाडमध्ये उपक्रमाचा शुभारंभ; पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांच्या संकल्पनेतून उपक्रम

■ **रायगड (भावना जैन) :** रायगड जिल्ह्यात भविष्यातील पाणी टंचाईचे संकट रोखण्यासाठी पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'पालकमंत्री वनराई बंधारा' उपक्रमाचा शानदार शुभारंभ महाड तालुक्यातील विन्हेरे गावात करण्यात आला. लोकसहभाग आणि श्रमदानातून उभारलेला हा उपक्रम जिल्ह्यासाठी आदर्श ठरणार आहे.रायगड जिल्ह्यात यंदा कमी पाऊस आणि भूजल पातळी खालावल्याने भविष्यात पाणी टंचाई आणि दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची



शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी संपूर्ण जिल्हाभरात पाच हजार वनराई बंधारे बांधण्याची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली असून, त्याचा शुभारंभ महाड तालुक्यातील विन्हेरे येथे करण्यात आला.विन्हेरे गावातील बाग आळी येथील स्थानिक ओढ्यावर ग्रामस्थांच्या श्रमदानातून हा पहिला बंधारा बांधण्यात आला. विशेष म्हणजे वाळूच्या गोण्या आणि मातीच्या पिशव्या वापरून हा पर्यावरणपूरक बंधारा उभारण्यात आला आहे. या एका बंधाऱ्यामुळे तब्बल ९५ लाख लिटर पाण्याची साठवण होणार असून, याचा थेट फायदा शेतीला, पिण्याच्या पाण्यासाठी आणि वन्य प्राण्यांना होणार आहे.या शुभारंभ सोहळ्याला पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, पंचायत समिती सदस्य संदीप खेडबीडे, प्रांताधिकारी पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे, वन विभागाचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. स्वतः पालकमंत्र्यांनी श्रमदान करून ग्रामस्थांचा उत्साह वाढवला.यावेळी बोलताना पालकमंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, हा फक्त शासकीय उपक्रम नाही तर लोकचळवळ आहे. पाणी आडवा, पाणी जिरवा या मंत्राने प्रत्येक गावात असा बंधारा व्हावा. सर्व राजकीय पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी यात सक्रिय सहभाग घेऊन जिल्ह्यातील ५ हजार बंधाऱ्यांचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे आवाहन पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी यावेळी केले.


दुखापतीमुळे ईशान किशन तिसऱ्या सामन्यातून OUT; युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीसाठी प्लेइंग-११ चे दरवाजे खुले!

■ **वृत्तसंस्था :** न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेदरम्यान भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशन तिसऱ्या सामन्यातही खेळू शकणार नसल्याची अधिकृत माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) २६ ऑक्टोबर रोजी दिली. मालिकेतील पहिल्या टी-२० सामन्यादरम्यान ईशानच्या उजव्या मांडीच्या स्नायूला किरकोळ दुखापत झाली होती. त्यानंतर तो वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली उपचार घेत असून त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत असली, तरी तो अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त झालेला नसल्याने २७ ऑक्टोबर रोजी वेलिंग्टन येथे होणाऱ्या तिसऱ्या टी-२० सामन्यातून त्याला बाहेर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुखापत पूर्णपणे बरी होईपर्यंत त्याला मैदानात उतरवून कोणताही धोका पत्करायचा नाही, अशी भूमिका संघ व्यवस्थापनाने घेतली आहे. ईशानच्या पुनरागमनाबाबत अद्याप कोणतीही निश्चित तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. दुसऱ्या सामन्यात त्याच्या जागी युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली होती. मात्र, त्याला केवळ चार धावाच करता आल्या. आता तिसऱ्या सामन्यातही वैभवला पुन्हा संधी मिळण्याची शक्यता असून, यावेळी त्याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बीसीसीआयने जारी केलेल्या निवेदनात ईशान किशनच्या दुखापतीत सुधारणा होत असल्याचे स्पष्ट केले असून वैद्यकीय पथक त्याच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून असल्याचे सांगितले आहे. तसेच यष्टीरक्षक-फलंदाज कुमार कुशाग्र तिसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात कायम राहणार असल्याचीही घोषणा करण्यात आली आहे. दुसऱ्या सामन्यापूर्वी ईशानच्या जागी बदली खेळाडू म्हणून त्याचा संघात समावेश करण्यात आला होता. त्यामुळे तिसऱ्या सामन्यात भारतीय संघ कोणते अंतिम संयोजन निवडतो, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. सध्या भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली असून वेलिंग्टनमधील तिसरा सामना जिंकून मालिका आपल्या नावावर करण्याचा संघाचा प्रयत्न असेल. या मालिकेसाठी भारतीय संघात संजू सॅमसन (यष्टीरक्षक), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, कर्णधार श्रेयस अय्यर, शिवम दुबे, अक्षर पटेल, नमन धीर, नितीश कुमार रेड्डी, भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंग, मयंक यादव, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव आणि कुमार कुशाग्र यांचा समावेश आहे. ईशानच्या अनुपस्थितीत संघातील इतर खेळाडूंवर अधिक जबाबदारी असणार असून भारत मालिका जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे.



७९व्या वर्षी सोनिया गांधींची इन्स्टाग्रामवर एंट्री; पहिल्याच पोस्टमधून आत्मचरित्राची झलक

■ **वृत्तसंस्था :** काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी वयाच्या ७९व्या वर्षी सोशल मीडियावर अधिकृत पदार्पण करत इन्स्टाग्रामवर खाते सुरू केले आहे. त्यांच्या या अनपेक्षित डिजिटल प्रवेशाची राजकीय आणि सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली असून, पहिल्याच पोस्टला काही मिनिटांतच मोठा प्रतिसाद मिळाला. इन्स्टाग्रामवरील पहिल्या व्हिडिओमध्ये त्यांनी त्यांच्या आगामी 'Belonging: A Journey of Love' या बहुचर्चित आत्मचरित्राची पहिली प्रत चाहत्यांसमोर सादर केली. प्रकाशकांकडून पुस्तकाची हार्डकव्हर प्रत आणि पेढ्यांचा बॉक्स स्वीकारताना त्या आनंदी आणि भावूक दिसत आहेत. त्यानंतर पुस्तकाची पाने चाळताना त्यांनी शेजारी बसलेल्या कन्या



प्रियांका गांधी यांना प्रेमाने, "प्रियांका, यात खूप फोटो आहेत," असे सांगत जुन्या आठवणींनी भरलेले फोटो दाखवले. या प्रसंगी प्रियांका गांधी यांनी आईला पेढा भरवून मिठी मारल्याचा हृदयस्पर्शी क्षणही व्हिडिओमध्ये पाहायला मिळतो. आपल्या पहिल्याच पोस्टमध्ये सोनिया गांधी यांनी, "हॅलो एव्हरीवन, तुमच्या सर्वांसोबत हा क्षण शेअर करताना मला अतिशय आनंद होत आहे. हे पुस्तक प्रेम, कर्तव्य, दुःख आणि स्वतःचे अस्तित्व शोधण्याचा एक प्रवास आहे," असा संदेश देत थेट चाहत्यांशी संवाद साधला. त्यांच्या या पोस्टमुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटत असून, आत्मचरित्राबाबतची उत्सुकताही वाढली आहे. सोनिया गांधी यांचे 'Belonging: A Journey of Love' हे आत्मचरित्र १० नोव्हेंबर रोजी जगभरात एकाच वेळी प्रकाशित होणार आहे. या पुस्तकात गांधी कुटुंबावर झालेल्या आरोपांच्या पलीकडे जाऊन त्यांच्या आयुष्यातील मानवी पैलू, चुका, भावना आणि कठीण निर्णयांचा प्रामाणिक आढावा मांडण्यात आला आहे. विशेषतः १९८४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर आणि १९९१ मध्ये माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येनंतर त्यांच्या आयुष्यात झालेला आमूलाग्र बदल, त्या काळातील भावनिक संघर्ष, कुटुंबाची जबाबदारी आणि सार्वजनिक जीवनातील आव्हाने यांचा संवेदनशील उल्लेख पुस्तकात करण्यात आला आहे. त्यामुळे हे आत्मचरित्र केवळ राजकीय प्रवासापुरते मर्यादित न राहता एका व्यक्तीच्या आयुष्यातील भावनिक आणि मानवी अनुभवांची कहाणी उलगडणारे ठरणार असल्याची चर्चा आहे. इन्स्टाग्रामवरील पहिल्याच पोस्टमधून आत्मचरित्राची झलक सादर करून सोनिया गांधी यांनी डिजिटल माध्यमात प्रभावी सुरुवात केली असून, त्यांच्या या नव्या प्रवासासह पुस्तकाच्या प्रकाशनाबाबतची उत्सुकता आणखी वाढली आहे.

AI तंत्रज्ञान आणि ५५ दिग्गज कलाकारांचा संगम; पहिल्यांदाच येतोय मराठीतील एआय (AI) चित्रपट 'बागुलबुवा'!

■ **वृत्तसंस्था :** आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) तंत्रज्ञानाचा प्रभाव आता मराठी चित्रपटसृष्टीतही दिसू लागला आहे. एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला 'बागुलबुवा' हा मराठीतील पहिलाच चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात प्रत्यक्ष कलाकारांच्या अभिनयासोबत एआय तंत्रज्ञानाचा वापर करून एक वेगळा आणि भव्य सिनेमॅटिक अनुभव साकारण्यात आला आहे. एसएस फिल्म्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाचे निर्माते शरद पाटील आणि अंजली पाटील आहेत. अभिनेता-दिग्दर्शक चेतन चावडा यांनी चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन केले असून, पटकथा नितीन चव्हाण, संकलन विनोद राजे, व्हीएफएक्स अथर्व



चव्हाण आणि स्टोरीबोर्ड आकाश पांडे यांनी सांभाळला आहे. चित्रपटातील एआय तंत्रज्ञानाची जबाबदारी मेटाफेक्स प्रोडक्शनने पार पाडली आहे. अभिजीत खांडकेकर प्रमुख भूमिकेत दिसणार असून, अन्य ५५ कलाकारांची नावे अद्याप गुप्त ठेवण्यात आली आहेत. चित्रपटाचा टायटल टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून, त्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हॉलीवूड शैलीची झलक असलेल्या या टीझरमध्ये पुणे आणि परिसरात घडणारी रहस्यमय कथा दाखवण्यात आली आहे. एका गूढ संकटामुळे लोकांच्या डोळ्यांवर परिणाम होतो आणि 'बागुलबुवा' नेमका काय आहे, याचा उलगडा चित्रपटातून होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून मराठी चित्रपटांची भव्यता वाढवण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. एआयच्या साहाय्याने तयार झालेल्या दृश्यांबरोबरच आणखी काही विशेष सरप्राइजेसही चित्रपटात असणार असल्याचा दावा निर्मात्यांनी केला आहे. त्यामुळे 'बागुलबुवा' हा मराठी चित्रपटसृष्टीतील तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिमरनच्या 'या' ऐतिहासिक कामगिरीने देशाची मान उंचावली; जंगी स्वागताची तयारी

■ **वृत्तसंस्था :** जपानमध्ये सुरू असलेल्या एशियन पॅरा गेम्स २०२६ स्पर्धेत उत्तर प्रदेशातील गाझियाबादची पॅरा धावपटू आणि अर्जुन पुरस्कार विजेती सिमरन हिने ऐतिहासिक कामगिरी करत भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. सिमरनने १०० मीटर आणि २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत दुहेरी यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे भारतासह उत्तर प्रदेशचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल



झाले आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि अटळ आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवलेले हे यश देशातील युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे. क्रीडा क्षेत्रातील या यशाबरोबरच सिमरन उत्तर प्रदेश सरकारच्या पंचायती राज विभागात 'जिल्हा पंचायत राज अधिकारी' म्हणूनही कार्यरत असून, प्रशासकीय जबाबदारी आणि क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी यांचा तिने सुंदर समतोल साधला आहे. त्यामुळे तिच्यावर क्रीडा वर्तुळासह विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उत्तर प्रदेश सरकारकडून क्रीडा क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे हे उत्तम उदाहरण असल्याचेही बोलले जात आहे. सिमरनच्या या ऐतिहासिक यशाबद्दल पंचायती राज विभागाचे संचालक धीरेंद्र सिंह सचान यांनी तिचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, सिमरनने शिस्त, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला असून तिची कामगिरी केवळ क्रीडापटूंसाठीच नव्हे, तर देशातील प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. पाचव्या एशियन पॅरा गेम्समध्ये मिळवलेल्या या दुहेरी सुवर्णपदकाच्या सन्मानार्थ तिच्या स्वागतासाठी विशेष नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. सिमरन मायदेशी परतल्यानंतर नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर तिचे भव्य स्वागत करण्यात येणार असून, त्यानंतर लखनौमध्येही तिचा विशेष सत्कार केला जाणार आहे. एका प्रशासकीय अधिकाऱ्याने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत देशाला गौरव मिळवून देणे ही संपूर्ण राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद करत, तिच्या यशामुळे अधिकाधिक तरुण आणि शासकीय कर्मचारी क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरित होतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

'रामायण'च्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात

■ **वृत्तसंस्था :** दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या या नव्या झलकीत रॉकिंग स्टार यश रावणाच्या प्रभावशाली रूपात दिसत असून, नमित मल्होत्रांचा 'रामायण' हा चित्रपट ५ नोव्हेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे.नमित मल्होत्रांच्या 'रामायण: राइज ऑफ अ लेजेंड' या चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगला २० ऑक्टोबरपासून संपूर्ण भारतात सुरुवात होत असताना, निर्मात्यांनी दसऱ्याच्या निमित्ताने रॉकिंग स्टार यशची रावणाच्या भूमिकेतील खास झलक प्रदर्शित केली आहे. नव्याने प्रदर्शित झालेल्या या झलकीत यशचे लंकेचा पराक्रमी राजा रावणाच्या रूपातील परिवर्तन पाहायला मिळते. त्याचा प्रभावी लूक, तीव्र हावभाव आणि दमदार पडद्यावरील उपस्थिती लक्ष वेधून घेते. हिंदीमध्ये 'राइज ऑफ असुरा' असे शीर्षक असलेल्या या युनिटमध्ये एका प्रभावी संगीतमय सादरीकरणातून रावणाचे व्यक्तिमत्त्व उलगडण्यात आले आहे.हिंदू पौराणिक कथांनुसार, तांडव हे भगवान शिवाशी संबंधित वैश्विक नृत्य असून, ते सृष्टीची निर्मिती, पालन आणि विनाश या चक्रांचे प्रतीक मानले जाते. भगवान शिवाचा निस्सीम भक्त असलेल्या रावणाचा संबंध पारंपरिकरीत्या 'शिव तांडव स्तोत्रा'शी जोडला जातो. हे स्तोत्र भगवान शिवाची स्तुती करणारे असून, त्यातील प्रभावी लय आणि तीव्रतेसाठी प्रसिद्ध आहे. दसऱ्याच्या निमित्ताने प्रदर्शित करण्यात आलेली ही झलक या सांस्कृतिक आणि पौराणिक संदर्भांना उजाळा देते. रावणाची शिवभक्ती, त्याचे सामर्थ्य आणि त्याचे प्रभावी व्यक्तिमत्त्व यांवर प्रकाश टाकत, या व्यक्तिरेखेची मोठ्या पडद्यावरील मांडणी कशी असणार आहे, याची प्रेक्षकांना झलक मिळते.या नव्या झलकीत यश रावणाच्या भव्य आणि प्रभावशाली रूपात अगदी उठून दिसतो. त्याची दमदार देहबोली, त्याच्या लूकमधील बारकावे आणि व्यक्तिरेखेत त्याने आणलेली तीव्रता या झलकीला एक वेगळीच उंची देतात. या सादरीकरणातून रावणाच्या व्यक्तिरेखेची भव्यताही पाहायला मिळते. महाकाव्याच्या या नव्या रूपांतरात रावणाला एक सामर्थ्यशाली आणि गुंतागुंतीची व्यक्तिरेखा म्हणून साकारण्यात आले आहे. याआधीच्या चित्रपटांमधून आपल्या दमदार पडद्यावरील उपस्थितीची छाप पाडणाऱ्या यशसाठी, भारतीय पौराणिक कथांमधील सर्वाधिक ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तिरेखांपैकी एक असलेल्या रावणाची भूमिका साकारणे हा एक वेगळा आणि लक्षवेधी टप्पा ठरणार आहे. दसऱ्याच्या निमित्ताने प्रदर्शित झालेल्या या झलकीला विशेष महत्त्व आहे, कारण हा सण भगवान श्रीरामांनी रावणावर मिळवलेल्या विजयाशी संबंधित आहे. रणबीर कपूर भगवान श्रीरामांच्या भूमिकेत, तर यश रावणाच्या भूमिकेत दिसणार असल्याने, अनेक पिढ्यांपासून



भारतीयांच्या सांस्कृतिक जाणिवांचा भाग असलेल्या या महाकाव्याच्या नव्या रूपांतरात दोन आघाडीचे कलाकार एकत्र पाहायला मिळणार आहेत.दसऱ्याच्या दिवशी निर्मात्यांनी सोशल मीडियावर ही झलक शेअर केली. त्यासोबतच चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगला आजपासून सुरुवात होणार असल्याची घोषणाही करण्यात आली. टी-सीरिजच्या संगीत लेबलअंतर्गत प्रदर्शित झालेल्या या रावण तांडव युनिटला हिंदीमध्ये 'राइज ऑफ असुरा', कन्नडमध्ये 'रावण तांडव', तर तमिळ आणि तेलुगूमध्ये 'रावण तांडवम' असे शीर्षक देण्यात आले आहे. हिंदी आवृत्तीला विशाल ददलानी यांचा आवाज लाभला असून, डॉ. कुमार विश्वास यांनी गीतलेखन केले आहे. ए. आर. अमीन आणि हिरल विराडिया यांनी संगीत पर्यवेक्षणाची जबाबदारी सांभाळली आहे. तर तमिळ आवृत्तीत अनिरुद्ध रविचंदर आणि जी. व्ही. प्रकाश कुमार यांचे स्वर ऐकायला मिळतात.जगातील सर्वाधिक पूजनीय महाकाव्यांपैकी एक असलेल्या 'रामायण'ला मोठ्या पडद्यावर साकारण्यात आले आहे. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान श्रीरामांच्या भूमिकेत, साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत, रॉकिंग स्टार यश रावणाच्या भूमिकेत, सनी देओल हनुमानाच्या भूमिकेत आणि रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत दिसणार आहेत.नितेश तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाची निर्मिती नमित मल्होत्रा यांच्या प्राइम फोकस स्टुडिओजने आठ वेळा ऑस्कर पुरस्कार जिंकलेल्या DNEG आणि यशच्या मॉन्स्टर माइंड क्रिएशन्स यांच्या सहकार्याने केली आहे. 'रामायण' हा दोन भागांमध्ये साकारला जाणारा भव्य महाकाव्यात्मक चित्रपट आहे. या चित्रपटाचा पहिला भाग ५ नोव्हेंबर २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार असून, दुसरा भाग दिवाळी २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हे दोन्ही चित्रपट भारतात हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम या भाषांमध्ये प्रदर्शित होतील. हा चित्रपट IMAX स्वरूपातही प्रदर्शित होणार आहे. भारत वगळता जगभरातील वितरणाची जबाबदारी सोनी पिक्चर्स सांभाळणार असून, हिंदी भाषिक बाजारपेठेत धर्मा प्रॉडक्शन्स या चित्रपटाचे वितरण करणार आहे.

डाएट करणाऱ्यांनो, ओट्स खावेत की म्यूसली? जाणून घ्या कोणता पर्याय उत्तम!

■ **वृत्तसंस्था :** डाएट करणारे अनेक लोक वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नाश्त्यात ओट्स किंवा म्यूसली खाणं पसंत करतात. सध्या बाजारात विविध ब्रँडचे ओट्स आणि म्यूसली उपलब्ध आहेत. आकर्षक पॅकेजिंग आणि आरोग्यदायी असल्याच्या दाव्यांमुळे या पदार्थांची लोकप्रियताही वाढली आहे. मात्र, प्रत्येक ओट्स किंवा म्यूसली आरोग्यासाठी सारखीच फायदेशीर असेल असं नाही. काही उत्पादनांमध्ये अतिरिक्त साखर, फ्लेवर्स आणि इतर घटक असू शकतात. त्यामुळे नाश्त्यासाठी ओट्स किंवा म्यूसली निवडताना त्यातील पोषक तत्त्वे, साखरेचं प्रमाण आणि फायबर यांकडे लक्ष देणं महत्त्वाचं आहे.

ओट्स खाण्याचे फायदे

ओट्स हा नाश्त्यासाठी उत्तम मानला जाणारा पौष्टिक पदार्थ आहे. वजन नियंत्रणात ठेवू इच्छिणारे, फिटनेसकडे लक्ष देणारे आणि संतुलित आहार घेणारे अनेक जण ओट्सचा आहारात समावेश करतात. ओट्समध्ये फायबर, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि विविध खनिजे आढळतात. विशेषतः त्यातील बीटा-ग्लुकन या विद्राव्य फायबरमुळे ओट्स पचनक्रिया आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणासाठी उपयुक्त ठरू शकतात. मात्र, त्याचे फायदे मिळवण्यासाठी ओट्स योग्य प्रमाणात आणि संतुलित पद्धतीने खाणे महत्त्वाचे आहे.

१. वजन नियंत्रणासाठी फायदेशीर



ओट्समध्ये असलेले फायबर पोट भरल्याची भावना अधिक काळ टिकवण्यास मदत करते. त्यामुळे वारंवार भूक लागणे आणि मधेच काहीतरी खाण्याची इच्छा कमी होऊ शकते.

२. कोलेस्ट्रॉल नियंत्रणासाठी मदत

ओट्समधील बीटा-ग्लुकन हे विद्राव्य फायबर रक्तातील एकूण आणि LDL म्हणजेच खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करू शकते. त्यामुळे हृदयाच्या आरोग्यासाठी ओट्सचा संतुलित आहारात समावेश फायदेशीर ठरू शकतो.

३. रक्तातील साखरेच्या नियंत्रणासाठी उपयुक्त

ओट्समधील विद्राव्य फायबर अन्नपचन आणि कार्बोहायड्रेट्सचे शोषण मंदावण्यास मदत करू शकते. त्यामुळे रक्तातील साखरेत होणारी वाढ नियंत्रित ठेवण्यास हातभार लागू शकतो.

४. पचनक्रिया सुधारण्यास मदत

ओट्समधील फायबर मल मऊ ठेवण्यास आणि नियमित शौचास मदत करू शकते. पुरेसे पाणी पिणे आणि आहारात फळे, भाज्या व इतर फायबरयुक्त पदार्थ घेणेही आवश्यक आहे.

म्यूसली खाण्याचे फायदे

म्यूसली हा नाश्त्यासाठी लोकप्रिय होत असलेला पौष्टिक पदार्थ आहे. वजन नियंत्रणात ठेवू इच्छिणारे, फिटनेसकडे लक्ष देणारे आणि दिवसभर उत्साही राहण्यासाठी संतुलित आहार घेणारे अनेक जण नाश्त्यात म्यूसली खाणे पसंत करतात. म्यूसलीमध्ये साधारणपणे ओट्स, विविध धान्ये, सुकामेवा, बिया आणि सुकवलेली फळे यांचा समावेश असतो. त्यामुळे शरीराला फायबर, कार्बोहायड्रेट्स, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळू शकतात.

१. स्नायूंच्या आरोग्यासाठी मदत

म्यूसलीमध्ये काही प्रमाणात वनस्पतीजन्य प्रथिने असतात. त्यात दूध किंवा दही मिसळल्यास प्रथिनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे स्नायूंची देखभाल आणि शरीराच्या ऊतींच्या दुरुस्तीसाठी मदत मिळू शकते.

२. शरीराला जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात

म्यूसलीमध्ये वापरलेल्या धान्यांनुसार आणि सुक्या मेव्यानुसार मॅग्नेशियम, लोह, झिंक आणि बी समूहातील जीवनसत्त्वे मिळू शकतात. हे घटक शरीरातील विविध कार्यांसाठी आवश्यक असतात. मात्र, त्यांचे प्रमाण उत्पादनानुसार बदलते.

३. नाश्त्याचा पौष्टिक पर्याय

सकाळी कमी वेळ असल्यास म्यूसली हा सोपा नाश्त्याचा पर्याय ठरू शकतो. दूध किंवा दह्यासोबत फळे आणि सुकामेवा घालून खाल्ल्यास नाश्ता अधिक संतुलित बनवता येतो.

ओट्स आणि म्यूसली यांपैकी काय निवडावे?

साधे ओट्स हा कमी प्रक्रिया केलेला आणि साखर न घातलेला पर्याय आहे. म्यूसलीमध्ये धान्यांसोबत सुकामेवा आणि बिया असल्याने विविध पोषक तत्त्वे मिळू शकतात; परंतु त्यातील अतिरिक्त साखर तपासणे महत्त्वाचे आहे. वजन नियंत्रणासाठी दोन्ही पर्याय योग्य ठरू शकतात.

कर्जतमध्ये घरफोडी करणाऱ्या दोघांना बेड्या; अडीच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

फार्महाऊससह घरांना लक्ष्य; सहा चोरीच्या गुन्ह्यांची उकल

■ **कर्जत (विशेष प्रतिनिधी) :** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात फार्महाऊस, घरे आणि बांधकामासाठी ठेवलेल्या साहित्याची चोरी करणाऱ्या दोन संशयितांना कर्जत पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सहा वेगवेगळ्या चोरीच्या गुन्ह्यांची उकल करत सुमारे अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कर्जत पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई केली.सप्टेंबर २०२६ मध्ये कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या सहा गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांना हे यश मिळाले. गुन्हा रजिस्टर



क्रमांक ३५५, ३५६, ३५७, ३५८, ३६७ आणि ३६८ या प्रकरणांचा तपास सुरू असताना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे सुबवे येथील तुषार चवळे आणि राहुल पेमारे या दोघांना ताब्यात घेण्यात आले.पोलिसांच्या आरोपानुसार, या दोघांनी संगनमताने कशेळे परिसरातील विविध फार्महाऊस आणि घरांमध्ये चोरी केली. तसेच बांधकामासाठी आणून ठेवलेल्या साहित्यावरही त्यांनी डल्ला मारल्याचा संशय आहे. परिसरात घडलेल्या चोरीच्या घटनांचा तपास करताना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली.या चोरीच्या घटनांमध्ये बोअरिंगची मोटार, वॉशिंग मशीन, ३२ इंची टीव्ही, चार बॅटऱ्या, चार इन्व्हर्टर, एक मोटारसायकल आणि १८ जीआय लोखंडी पाइप चोरण्यात आल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी हा मुद्देमाल हस्तगत केला असून त्याची एकूण किंमत सुमारे दोन लाख ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.या कारवाईमुळे कर्जत परिसरातील सहा चोरीच्या गुन्ह्यांचा तपास पुढे सरकला आहे. फार्महाऊस आणि घरांमध्ये चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाली होती. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे चोरीच्या घटनांचा छडा लावण्यास मदत झाली आहे.कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. कशेळे दूरक्षेत्रातील हवालदार लालासाहेब तोरवे, कॉन्स्टेबल राहुल जाधव, तसेच गुन्हे प्रकटीकरण कक्षातील केशव नागरगोजे, समीर भोईर, स्वप्निल येरुनकर, सतीश पाटील, योगेश गर्जे, ऋतिक गोऱ्हाणे आणि घुले यांनी तपासात सहभाग घेतला.या प्रकरणातील चोरीच्या घटनांबाबत पुढील तपास कर्जत पोलिसांकडून सुरू आहे.

दानोळी खून प्रकरणाचा उलगडा; चार संशयित पोलिसांच्या ताब्यात

■ **जयसिंगपूर (विशेष प्रतिनिधी) :** शिरोळ तालुक्यातील दानोळी येथे रेकॉर्डवरील गुन्हेगार महेश बजरंग दळवी (वय ४१) याच्या निर्घृण हत्येप्रकरणी पोलिसांनी चार संशयितांना अटक केली आहे. जमीन व्यवहार आणि अन्य कारणांतून हा खून झाल्याचा प्राथमिक अंदाज तपासातून व्यक्त करण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या संशयितांना न्यायालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. महेश दळवी याची १९ ऑक्टोबर रोजी बंदुकीतून गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे दानोळी परिसरात खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पाच पथके तयार करण्यात आली होती. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय



माहितीच्या आधारे तपासाला दिशा मिळाली. त्यानंतर पोलिसांनी हातकणंगले परिसरातून चार संशयितांना ताब्यात घेतले.या प्रकरणात रोहित भूपाल मगदूम (वय ३६, रा. उमळवाड, ता. शिरोळ), संतोष भीमराव कोळी (वय २७, रा. चांदोली वसाहत, दानोळी), अनमोल सुनील करे (वय ३३, रा. कोथळी, ता. शिरोळ) आणि अश्विनकुमार ऊर्फ ऋषीकेश राजेंद्र भोई (वय २९, रा. हारुगडे प्लॉट, सांगलीवाडी, सांगली) यांना अटक करण्यात आली आहे.पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, महेश दळवी याच्या हत्येसाठी पूर्वनियोजन करण्यात आले होते. संशयितांनी आधी रेकी करून त्यानंतर हा गुन्हा केल्याचे तपासात समोर येत आहे. प्राथमिक चौकशीत संशयितांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मात्र, हत्येमागील नेमके कारण आणि गुन्ह्यात प्रत्येकाची भूमिका याबाबत अधिक तपास सुरू आहे.या हत्येसाठी वापरण्यात आलेली बंदूक अद्याप पोलिसांच्या हाती लागलेली नाही. त्यामुळे हत्येत वापरलेले शस्त्र कुठून आणले, त्याची व्यवस्था कोणी केली आणि या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, या दिशेने तपास सुरू आहे. जमीन व्यवहाराव्यतिरिक्त अन्य काही वाद किंवा कारणे या हत्येमागे आहेत का, याचाही शोध घेतला जात आहे.चारही संशयितांना न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीला DRI चा दणका; ३ कोटींच्या सोन्यासह चौघांना बेड्या

■ **मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने (DRI) पर्दाफाश केला आहे. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या कारवाईत २४ कॅरेटचे परदेशी बनावटीचे २.२९ किलो सोने जप्त करण्यात आले असून त्याची बाजारातील किंमत सुमारे ३ कोटी रुपये आहे. या प्रकरणात बांगलादेशी नागरिक मोहम्मद जिनाथ होसेन याच्यासह व्हीजे केवट, एससी डोंगरे आणि एसटी माखिजा या चौघांना अटक करण्यात आली आहे. तपासानुसार, दुबईहून मुंबईत आलेला ट्रान्झिट प्रवासी मोहम्मद जिनाथ होसेन तस्करीचे सोने विमानतळावरील कर्मचाऱ्याकडे सुपूर्द करणार होता. डीआरआयच्या पथकाने त्याच्यावर पाळत ठेवली असता, प्रस्थान



विभागातील स्वच्छतागृहाजवळ त्याने विमानतळावरील दुकानात काम करणाऱ्या केवटकडे एक पॅकेज दिल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन तपासणी केली असता मेणाच्या स्वरूपात लपवलेल्या सोन्याच्या कॅप्सूल जप्त करण्यात आल्या. चौकशीत केवटने आणखी काही प्रवासी अशाच प्रकारे सोन्याच्या कॅप्सूल घेऊन येणार असल्याची माहिती दिल्यानंतर डीआरआयने सापळा रचला. त्यानुसार डोंगरे आणि माखिजा हे केवटकडे मोज्यांमध्ये लपवलेले पॅकेज घेऊन आले असता त्यांनाही ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातूनही सोन्याच्या कॅप्सूल जप्त करण्यात आल्या. आरोपींपैकी कोणालाही जप्त केलेल्या सोन्याची कायदेशीर कागदपत्रे सादर करता आली नसल्याचे डीआरआयने स्पष्ट केले आहे. या प्रकरणात सोन्याचा स्रोत, तस्करीचे संपूर्ण रॅकेट, वितरण व्यवस्था तसेच अवैध आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू असून सिंडिकेटमधील इतर सदस्यांपर्यंतही तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. दरम्यान, आरोपींच्या वकिलांनी न्यायालयात सर्व आरोपी एकमेकांना ओळखत नसल्याचा दावा केला असला, तरी न्यायालयाने चौघांनाही न्यायालयीन कोठडी सुनावली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

नागपुरात एमडी ड्रग्जचा मोठा साठा जप्त!

१.५४ कोटींचा मुद्देमाल हस्तगत; पाच आरोपी ताब्यात

■ **नागपूर (विशेष प्रतिनिधी) :** नागपूर शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ५ च्या पथकाने बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत १, ४०५ ग्रॅम एमडी सदृश्य पावडरसह एकूण १ कोटी ५४ लाख ५० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, कुख्यात आरोपी विशाल ऊर्फ फल्ली गुप्ता याच्यासह अन्य संशयितांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरेंद्र नगर येथील रिंग रोडवरील भारत पेट्रोल पंपाजवळ असलेल्या विजया अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या एमडी सदृश्य पावडरची किंमत १ कोटी ४० लाख ५० हजार रुपये आहे. याशिवाय सहा मोबाईल,



एक व्हर्ना कार, चार दुचाकी, इलेक्ट्रिक वजनकाटा, बॅग आणि ३ लाख ४४ हजार ७०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.या प्रकरणात अनिकेत ऊर्फ अन्नू बिहारे, शुभम ऊर्फ डोरेमॉन नरवरिया, कृष्णा वर्मा, तुफानसिंग सिसोदिया आणि राहुल गोंड यांना ताब्यात घेण्यात आले. यातील अनिकेत बिहारे हा मकोका गुन्ह्यात फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.कुख्यात विशाल ऊर्फ फल्ली गुप्ता, भूपेंद्रसिंग आणि सहेली पंधराम यांचा शोध सुरू आहे. बेलतरोडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम ८(क), २२(ब) व २९ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, या अमली पदार्थांच्या तस्करीमागील नेटवर्कचा तपास केला जात आहे.

शिवनगरमध्ये ५१ वर्षीय महिलेचा विनयभंग; घरात घुसून गैरवर्तन केल्याचा आरोप

तोंडाला काळा मास्क लावून घरात प्रवेश; महिलेच्या तक्रारीनंतर संजय म्हात्रेविरोधात रसायनी पोलिसांत गुन्हा दाखल

■ **रसायनी (विशेष प्रतिनिधी) :** घर हे प्रत्येकासाठी सुरक्षिततेचे आणि विश्वासाचे ठिकाण मानले जाते.मात्र, घरातच महिलेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवनगर परिसरात उघडकीस आली आहे. एका ५१ वर्षीय महिलेच्या घरात तोंडाला काळा मास्क लावून प्रवेश करत त्यांच्याशी गैरवर्तन करून विनयभंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे.याप्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून संजय दामोदर म्हात्रे याच्या विरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शिवनगर परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या



माहितीनुसार, बुधवार (दि.२१) ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास शिवनगर येथे हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे.तक्रारदार ५१ वर्षीय महिला आपल्या घरी असताना, याच परिसरात राहणाऱ्या संजय दामोदर म्हात्रे याने तोंडाला काळा मास्क लावून महिलेच्या घरात प्रवेश केल्याचा आरोप आहे. घरातील हॉलमधून तो थेट देवघरात गेला.त्यावेळी घरात अनोळखी व्यक्ती आल्याचे लक्षात येताच महिलेने त्याला 'तू कोण आहेस?' अशी विचारणा केली.मात्र, संबंधित व्यक्तीने हुंकारासारखा आवाज काढत महिलेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला.त्यानंतर महिलेची मान खाली वाकवून तिच्या पाठीवर हात फिरवत तिच्याशी गैरवर्तन केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या प्रकारामुळे महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.घरात घडत असलेल्या या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने जोरात आरडाओरडा केला. महिलेचा आवाज ऐकताच संबंधित व्यक्तीने घटनास्थळावरून पळ काढल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर महिलेने या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.महिलेच्या तक्रारीची दखल घेत रसायनी पोलिसांनी संजय म्हात्रे याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील कलम ७४ आणि ३३३ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार प्रांजली पाटील करीत आहेत.महिलांच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती केली जात असतानाही घरातच अशा प्रकारच्या गैरवर्तनाच्या घटना समोर येणे ही चिंतेची बाब आहे.महिलांना घरात आणि घराबाहेरही सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. शिवनगरमधील या प्रकरणात पोलिसांच्या तपासातून नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट होणार असून, पुढील तपासाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

इचलकरंजीत कौटुंबिक वादातून महापालिका कर्मचाऱ्याचा खून

■ **कोल्हापूर (विशेष प्रतिनिधी) :** इचलकरंजी महापालिकेच्या सेवेत असलेल्या एका कर्मचाऱ्याचा कौटुंबिक कलहातून झालेल्या वादात पत्नीने साखर झोपेत खून केल्याची धक्कादायक घटना रविवारी उघडकीस आली.पती सागर दीपक बुरसे (वय ३५ रा. त्रिशूल चौक) याचा डोक्यात खलबत्ता घालून खून केल्यानंतर पत्नी वैशाली हिने नातेवाईकांसोबत थेट पोलिस ठाणे गाठत गुन्ह्याची कबुली दिली. ऐन सणासुदीच्या काळात घडलेल्या या घटनेने गावभागात खळबळ उडाली आहे. खूनाचे नेमके कारण मात्र समजू शकलेले नाही.याबाबत पोलिस व घटनास्थळावरुन मिळालेली माहिती अशी, इचलकरंजी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात सागर बुरसे कामास होता. तारदाळ येथील वैशाली हिच्याशी त्याचा विवाह झाला होता.परंतु, कौटुंबिक कारणांवरून त्यांच्यात सतत वाद होत होते. त्यातूनच काही वर्षांपूर्वी दोघेही विभक्त झाले होते. तर, वैशाली हिने दुसरा विवाह केला होता. त्याच्याशी तिचा घटस्फोट झाला आहे. त्यामुळे महिन्याभरापासून सागर व वैशाली यांच्यात समेट होऊन दोघे पुन्हा एकत्र राहत होते. त्यांना एक मुलगी आहे.दोघे एकत्र आले तरी कुरगुरू सुरूच होत्या. रविवारी पहाटेच्या सुमारास दोघांमध्ये पुन्हा कौटुंबिक कारणातून वाद झाला होता. त्यानंतर दोघेही झोपी गेले होते. झोपेत असलेल्या सागर याच्या डोक्यात वैशाली हिने खलबत्ता घातल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. सकाळी उठल्यानंतर नेहमीच्या कामाच आवराआवर झाल्यानंतर वैशालीने आपल्या वडिलांना व भावाला फोन करुन सागर याचा खून केल्याची माहिती दिली. माहिती मिळताच वडील व भाऊ दोघेही घटनास्थळी आले. त्यांना घेऊन वैशालीने थेट गावभाग पोलिस ठाणे गाठले आणि पतीचा खून केल्याची कबुली दिली.या घटनेची माहिती मिळाल्यानंतर सागर याच्या आई व बहिणीने केलेला आक्रोश उपस्थितांचे हृदय पिळवटून सोडत होता. घटनास्थळी भागातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. खूनाची माहिती मिळताच गावभागचे पोलिस निरीक्षक महेश चव्हाण यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह विच्छेदनासाठी इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात पाठवला. पोलिसांनी संशयित वैशालीला ताब्यात घेतले आहे.

बेवारस मृतदेह

खार पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ७१/२०२६, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये वय अंदाजे ४५



वर्षे, उंची १७१ सेमी, बांधा- सडपातळ, रंग- सावळा, केस- काळे दाढी मिशी वाढलेली असलेला बेवारस इसम तिसावा रस्ता, खार पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये बेशुद्धावस्थेत मिळून आला असून त्यास उपचाराकामी भाभा रुग्णालय बांद्रा (प) येथे दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून दाखलपूर्व मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

संपर्क-
श्री. पलाश वाघ, पोलीस उपनिरीक्षक
खार पोलीस ठाणे, मुंबई
मोबाईल क्र: ७०२०३८१५३८
पोलीस ठाणे क्रमांक : ८९७६९५१९८०

बेवारस मृतदेह

खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ५२/२०२६, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये




बेवारस मयत इसम नामे संतोष बबन वावरे वय अंदाजे- ३१ वर्षे रंग- सावळा, बांधा- हडकुळा, उंची अंदाजे- ५ फूट, केस- काळे, असलेला बेवारस इसम खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

संपर्क-
श्री.विठ्ठल आटोळे, पोलीस उपनिरीक्षक
खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई
मोबाईल क्र: ९५२७०७८१४१
पोलीस ठाणे क्रमांक: ८९७६९४७९७४
०२२-२६५७०८७७

बेवारस मृतदेह

खार पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ५१/२०२६, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये वय



अंदाजे ३५ वर्षे, उंची ५.३ इंच, बांधा- मध्यम, रंग- सावळा, केस- काळे दाढी मिशी वाढलेली असलेला बेवारस इसम दांडेकर बुवा चौक, खार पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये बेशुद्धावस्थेत मिळून आला असून त्यास उपचाराकामी भाभा रुग्णालय बांद्रा (प) येथे दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून दाखलपूर्व मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

संपर्क-
श्री. गौरव वेताळ, पोलीस उपनिरीक्षक
खार पोलीस ठाणे, मुंबई
मोबाईल क्र: ९०१११२१७२६
पोलीस ठाणे क्रमांक: ८९७६९५१९८०

दिवाळीपूर्वी FDA ची राज्यभर 'फेस्टिव्ह क्रॅकडाउन' धडक मोहीम

९.११ कोटींचा अन्नसाठा जप्त, ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित, २० आरोपींना अटक

■ **मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाकडून (FDA) भेसळयुक्त आणि निकृष्ट अन्नपदार्थांविरोधात कारवाईचे सत्र सुरूच आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार, अनियमितता आढळणाऱ्या आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यासह कठोर कारवाई केली जात आहे. आगामी दिवाळी आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर विभागाने 'फेस्टिव्ह क्रॅकडाउन' मोहीम राबवली आहे. नवरात्रोत्सवादरम्यान राज्यभरात केलेल्या कारवाईत ९.११ कोटी रुपयांचा निकृष्ट आणि भेसळयुक्त अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४.१९ कोटी रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. याशिवाय, राज्यभरात ३.१५ कोटी रुपयांचा गुटखा, पानमसाला आणि तंबाखू जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात



आले असून, सात आस्थापने बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, २२ गुन्हे दाखल करण्यात आले असून, २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. यावेळी ८३९२ किलो मुदतबाह्य, खराब आणि नाकारलेला अन्नसाठाही जप्त करण्यात आला. तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या सहाही विभागांत ही मोहीम राबवण्यात आली. नष्ट करणे आवश्यक असलेले अन्नपदार्थ पुन्हा बाजारात आणून ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई केली आहे. दरम्यान, दिवाळीच्या काळात मिठाई, खवा, खाद्यतेल, सुकामेवा आणि फराळाच्या पदार्थांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे FDA कडून तपासणी आणि कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर FDA च्या सोलापूर विभागातील झोन-२ ने माळशिरस येथे कारवाई केली. पुणे-पंढरपूर मार्गावर खवा वाहतूक करणाऱ्या MH २५ AJ ४०२३ क्रमांकाच्या वाहनावर छापा टाकून १३३७ किलो खवा जप्त करण्यात आला. हा खवा धाराशिव जिल्ह्यातील तीन उत्पादकांनी तयार केला होता. तो सातारा शहरातील घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांना विक्रीसाठी नेला जात होता. नियमांचे पालन न करता उघड्यावर वाहतूक होत असल्याचे आढळल्यानंतर तपासणी करण्यात आली. नाशवंत असल्याने जप्त केलेला खवा तपासणीनंतर खड्ड्यात टाकून नष्ट करण्यात आला.

वसई-विरार पूरमुक्त करण्यासाठी ३० वर्षांचे व्हिजन समोर ठेवून हायटेक लिडार सर्वेक्षण

■ **विरार (रघुनाथ कदम) :** मान्सूनमध्ये दरवर्षी पूरस्थितीचा सामना करणाऱ्या वसई-विरार शहराला कायमस्वरूपी पूरमुक्त करण्यासाठी महापालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. शहराच्या पुढील ३० वर्षांतील संभाव्य विस्ताराचा विचार करून पुण्यातील खडकवासला येथील 'केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्रा'मार्फत शहराचे अत्याधुनिक लिडार सर्वेक्षण आणि महापूर नकाशांकन सुरू करण्यात आले आहे. महापौर अजीव पाटील्या आणि महापालिका आयुक्त पृथ्वीराज पी. यांच्या प्रमुख उपस्थितीत या तांत्रिक अभ्यासाला सुरुवात झाली. वसई, नालासोपारा आणि विरारमधील सखल भागांमध्ये दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचल्याने



जनजीवन विस्कळीत होते. ही समस्या सोडवण्यासाठी २०१८ मध्ये महापालिकेने १२ कोटी रुपये खर्च करून प्राथमिक अभ्यास केला होता. त्याच्या आधारे अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना आखण्यात आल्या; मात्र निधीअभावी अनेक प्रकल्प प्रलंबित राहिले. आता या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. या सर्वेक्षणातून पुढील तीन दशकांतील वाढत्या नागरीकरणाचा विचार करून पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक आणि वेगवान निचरा करणारी सक्षम व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन आहे. समुद्राच्या भरती-ओहोटीचा नाल्यांमधील पाण्याच्या उलट प्रवाहावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी गणितीय प्रतिरूपण केले जाणार आहे. तसेच, लिडार तंत्रज्ञानाद्वारे शहरातील सूक्ष्म भौगोलिक चढ-उतार, पाण्याच्या निचऱ्यातील अडथळे आणि संभाव्य पूरप्रवण क्षेत्रांचे अचूक नकाशांकन केले जाणार आहे. तांत्रिक अहवालाची प्रतीक्षा असतानाच महापालिकेने तातडीच्या उपाययोजनाही सुरू केल्या आहेत. सनसिटी गास रस्ता, आचोळे मुख्य रस्ता, नवघर पूर्व रस्ता, विरार-खारोडी (बोळींज) आणि सेंट्रल पार्क परिसरातील सखल रस्त्यांची उंची टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आली आहे. निळेमोरे येथे पावसाचे अतिरिक्त पाणी साठवण्यासाठी खासगी विकासकांच्या सहभागातून होल्डिंग पॉण्ड विकसित करण्याचे नियोजनही सुरू आहे. दरम्यान, नालासोपारा आणि विरारदरम्यान रेल्वे रुळांवर पाणी साचून रेल्वे वाहतूक ठप्प होण्याची समस्या दूर करण्यासाठी महापालिकेने रेल्वे प्रशासनाकडे २६ कोटी ७१ लाख रुपये दिले होते. या निधीतून नालासोपारा उत्तर बाजू, नालासोपारा-विरारदरम्यान दक्षिण बाजू आणि वसई रोड-नालासोपारा दरम्यान तीन रेल्वे कल्व्हर्टची कामे पूर्ण झाली आहेत. यामुळे रुळांखालील पाण्याचा निचरा दुप्पट वेगाने होण्यास मदत होणार आहे. समग्र पूरनियंत्रण आराखड्यासाठी महापालिकेने राज्य शासनाकडे २९५ कोटी रुपयांच्या विशेष निधीची मागणी केली आहे. हा प्रकल्प 'महाराष्ट्र रिझिलन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम'अंतर्गत जागतिक बँकेच्या मदतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळग्रस्त तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी!

■ **मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यातील दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यांमधील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा देत परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी अनुदानित शाळांसह खासगी शाळांनाही बंधनकारक करण्यात आली आहे. गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सोमवारी ही माहिती दिली. दुष्काळामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होऊ नये, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, पालक शहरात राहत असले तरी त्यांची शेती दुष्काळग्रस्त तालुक्यात असल्यास त्यांच्या मुलांनाही या शुल्कमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार असून, शाळांनी शासनाच्या या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना या



योजनेचा लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांकडून आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. याचवेळी गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी शेतकरी आणि नागरिकांशी संबंधित अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवरही भाष्य केले. नोंदणीकृत सावकारांनी नियमबाह्य पद्धतीने जादा व्याजाची वसुली करू नये, असा इशारा देत अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास संबंधित सावकारांविरोधात चौकशी करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नांदेडमधील एका शेतकऱ्याच्या मृत्यूच्या प्रकरणात घातपाताची शक्यता तपासली जात असून, पोलिसांकडून सखोल तपास सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, सूक्ष्म वित्तपुरवठा कंपन्यांकडून सक्तीची वसुली होत असल्याच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जात असून, आवश्यक असल्यास अशा कंपन्यांविरोधात कठोर निर्णय घेतले जातील, असे त्यांनी नमूद केले. भंडारा येथे वृत्त प्रसिद्ध केल्यामुळे एका अधिस्वीकृतीधारक पत्रकारावर झालेल्या हल्ल्याची दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्याची माहितीही त्यांनी दिली. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असलेल्या अतिरिक्त खर्चाबाबतही वरिष्ठ अधिकारी योग्य ती दखल घेतील, असे भोयर यांनी स्पष्ट केले.

२०२८ पर्यंत भारताचा स्वतःचा 'ॲपल-सॅमसंग'सारखा ब्रँड असेल: अश्विनी वैष्णव

■ **नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती होत असून, २०२८ पर्यंत देशात पूर्णपणे डिझाइन केलेले, उत्पादित केलेले आणि भारतीय ब्रँडचे मोबाईल फोन बाजारात येतील, असा विश्वास केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. नवी दिल्ली येथे आयोजित शिखर परिषदेत त्यांनी भारताचे स्वतःचे 'ॲपल' किंवा 'सॅमसंग'सारखे जागतिक मोबाईल ब्रँड तयार करण्याचे उद्दिष्ट मांडले. एका मुलाखतीदरम्यान वैष्णव यांनी या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाची निश्चित तारीख जाहीर केली. "आज २३ ऑक्टोबर २०२६ आहे. ही तारीख लिहून ठेवा. २३ ऑक्टोबर २०२८ रोजी तुमच्या हातात पूर्णपणे भारतात डिझाइन केलेले, भारतात उत्पादित केलेले आणि भारतीय ब्रँडचे मोबाईल फोन असतील, " असे त्यांनी ठामपणे सांगितले. जागतिक स्मार्टफोन क्षेत्रात भारतासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. स्मार्टफोन निर्मितीतील तांत्रिक गुंतागुंत स्पष्ट करताना मंत्र्यांनी सांगितले की, एका छोट्याशा उपकरणात रेडिओ फ्रिक्वेन्सी कम्युनिकेशन, अँटेना, कम्प्युट, मेमरी, पॅसिव्ह



कम्पोनंट्स, कॅमेरा मॉड्यूल, डिस्प्ले आणि पॉवर मॅनेजमेंट यांसारखे अनेक घटक अत्यंत अचूकपणे बसवावे लागतात. मर्यादित जागेत वजन आणि ऊर्जेचे व्यवस्थापन करणे हे अत्यंत क्लिष्ट आव्हान आहे. भारतीय अभियंते हे आव्हान यशस्वीपणे पेलत असल्याचे त्यांनी नमूद केले. तीन वर्षांपूर्वी भारतीय डिझायनर्सना मोबाईलचे मदरबोर्ड अर्थात पीसीबी डिझाइन करण्याचे आव्हान देण्यात आले होते. त्यावेळी दोन भारतीय कंपन्यांनी पुढाकार घेतला. त्यापैकी एका कंपनीचे डिझाइन अमेरिकेतील सर्वात मोठ्या दूरसंचार सेवा पुरवठादार कंपनीने निवडले. या भारतीय कंपनीने '५जी-प्लस' स्मार्टफोन डिझाइन करून तो अमेरिकेत यशस्वीपणे पोहोचवला. या अनुभवातून विकसित झालेली क्षमता भारताचा स्वतःचा जागतिक मोबाईल ब्रँड उभारण्यासाठी उपयोगात आणली जाणार आहे. पूर्वीच्या सरकारांच्या धोरणांवर टीका करताना वैष्णव म्हणाले की, जुन्या नियमांमुळे भारतातील उत्पादन क्षेत्राची प्रगती मंदावली होती. १९९० नंतर काही प्रमाणात उदारीकरण झाले; मात्र २०१४ पूर्वी पुन्हा नियंत्रणवादी मानसिकतेमुळे प्रगती खुंटली. २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'मेक इन इंडिया' धोरणामुळे उत्पादन क्षेत्राला नवी दिशा आणि गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. भारत आता मोबाईल फोनसह ड्रोन, क्षेपणास्त्रे, आधुनिक ट्रेन आणि प्रगत उपकरणांची निर्मिती करत आहे. बारा वर्षांपूर्वी भारत इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्यात करेल, याची कल्पनाही करणे कठीण होते. मात्र, आज इलेक्ट्रॉनिक्स वस्तू भारताची तिसरी सर्वात मोठी निर्यात श्रेणी बनली असून, लवकरच ती दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

विदा गळती झाल्यास कंपन्यांना २५० कोटींहून अधिक दंडाची तरतूद

■ **पुणे (अकिल शेख) :** देशात लागू होणाऱ्या 'वैयक्तिक विदा संरक्षण कायद्या'च्या (डीपीडीपीए) तरतुदींनुसार ग्राहक किंवा कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती फुटल्यास संबंधित कंपन्या आणि व्यावसायिकांना २५० कोटी रुपयांपेक्षाही अधिक दंड होऊ शकतो. त्यामुळे या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी कंपन्या आणि व्यावसायिकांनी सज्ज राहण्याची गरज आहे, असा सूर कायद्यातील तरतुदींविषयी आयोजित चर्चासत्रात व्यक्त करण्यात आला. अनेक कंपन्यांकडे कायदेशीर आणि तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नसल्याने कायद्याचे पालन करणे आव्हानात्मक ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या चर्चासत्रात कृत्रिम बुद्धिमत्तातज्ज्ञ डॉ. भूषण केळकर, झपूर्झा सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार कुलकर्णी, तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याचे तज्ज्ञ ॲड. शुभम केणेकर यांनी मार्गदर्शन केले. कायद्यातील तरतुदी, दंडाची तरतूद, विदा सुरक्षेतील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली. डॉ. केळकर म्हणाले की, वकील, डॉक्टर, सनदी लेखापाल (सीए), अभियंते यांच्यासह



ग्राहकांची किंवा कर्मचाऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात साठवणाऱ्या आणि वापरणाऱ्या सर्व उद्योग-व्यावसायिकांना या कायद्यातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. काही व्यावसायिक ग्राहकांची माहिती कागदावर नोंदवतात; मात्र ही माहितीही डिजिटल स्वरूपात येऊ शकते. त्यामुळे सर्वच उद्योगांनी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करायला हवेत. ॲड. केणेकर यांनी सांगितले की, अमेरिका आणि युरोपसह जगातील अनेक देशांमध्ये विदा संरक्षणविषयक कायद्यांची अंमलबजावणी केली जात आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या क्रमवारीत भारत १२७ व्या क्रमांकावर आहे. डिजिटल व्यवहार करताना आपली माहिती कोणाला दिली जाते आणि तिचा वापर कशासाठी होतो, याबाबत नागरिकांनी सजग राहणे आवश्यक आहे. कोणतीही कंपनी किंवा ॲप स्पष्ट आणि कायदेशीर संमतीशिवाय ग्राहकांची माहिती वापरू शकत नाही. माहिती ज्या कारणासाठी घेतली आहे, त्याच कारणासाठी तिचा वापर करणे आणि काम पूर्ण झाल्यानंतर ती सर्व माध्यमांतून नष्ट करणे आवश्यक आहे. माहिती चोरीला गेल्यास संबंधित कंपनीला कोट्यवधी रुपयांचा दंड होऊ शकतो. विदा गळतीची माहिती मिळाल्यानंतर ७२ तासांत कंपनीच्या संचालक मंडळाला आणि ग्राहकांना कळवणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी सांगितले. मोठ्या प्रमाणावर डिजिटल माहिती हाताळणाऱ्या कंपन्यांनी 'डेटा प्रोटेक्शन ऑफिसर' (डीपीओ) नेमण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. दरम्यान, कायद्याच्या तरतुदींचे पालन होत आहे की नाही, हे तपासण्यासाठी 'डीपीडीपीए लेन्स' हा प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या भाषिणी आणि 'सर्वम एआय'च्या मदतीने या प्लॅटफॉर्मवर भारतीय भाषांमध्ये कागदपत्रे आणि आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली जात असल्याचे मंदार कुलकर्णी यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी dpdpalens.com या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले.

OTP चा गैरवापर करून गॅस सिलेंडरचा काळाबाजार; सहा जणांवर गुन्हा

■ **विरार (विशेष प्रतिनिधी) :** वसईमध्ये ग्राहकांच्या ओटीपीचा गैरवापर करून गॅस सिलेंडरची बनावट डिलिव्हरी दाखवत काळाबाजार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वसईतील 'अन्नपूर्णा गॅस एजन्सी'चे मालक, व्यवस्थापक तसेच हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) च्या विक्री व्यवस्थापकासह एकूण सहा जणांविरोधात वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, वसई न्यायालयातील तिसरे संयुक्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यश काने यांच्या सतर्कतेमुळे हा संपूर्ण प्रकार समोर आला. २८ सप्टेंबर २०२६ रोजी कोणतेही बुकिंग न करता त्यांच्या नावावर एलपीजी सिलेंडर बुक झाल्याचा संदेश आणि ओटीपी प्राप्त झाला. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्यांनी तात्काळ वसई पुरवठा विभागाकडे तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत पुरवठा निरीक्षक भागवत सोनार आणि जिल्हास्तरीय तपासणी पथकाने



अन्नपूर्णा गॅस एजन्सीवर छापा टाकून चौकशी सुरू केली. प्राथमिक तपासात एजन्सीमध्ये अनेक गंभीर अनियमितता आढळून आल्या. डिलिव्हरी बॉयच्या उपस्थितीची नोंद हजेरी पुस्तकात नव्हती, तर स्टॉक रजिस्टरमधील नोंदी पेन्सिलने करण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे त्या नंतर बदलण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. याशिवाय आवश्यक कागदपत्रांची मागणी केल्यावर एजन्सी व्यवस्थापनाकडून समाधानकारक माहिती न देता टाळाटाळ करण्यात आल्याचे तपासात समोर आले. पुरवठा विभागाने या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून गेल्या सहा महिन्यांतील स्टॉक रजिस्टर, आवक-जावक नोंदी, ऑनलाइन आणि ऑफलाइन बुकिंगची माहिती तसेच प्रत्यक्ष सिलेंडर मिळालेल्या ग्राहकांच्या तपशीलांची पडताळणी केली जात आहे. या माध्यमातून किती ग्राहकांच्या नावावर बनावट डिलिव्हरी दाखवण्यात आली, किती ओटीपींचा गैरवापर झाला आणि काळाबाजाराचे जाळे नेमके किती मोठे आहे, याचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचाही तपास सुरू आहे. पुरवठा निरीक्षक भागवत सोनार यांनी नागरिकांना महत्त्वाचे आवाहन करताना सांगितले की, गॅस सिलेंडरची प्रत्यक्ष डिलिव्हरी न झालेली असतानाही बुकिंग किंवा डिलिव्हरीचा ओटीपी अथवा संदेश प्राप्त झाल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशा प्रत्येक प्रकरणाची तात्काळ पुरवठा विभाग किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. ग्राहकांच्या सतर्कतेमुळे अशा प्रकारच्या फसवणुकीवर आळा घालणे शक्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे गॅस वितरण व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून तपास पूर्ण झाल्यानंतर आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मनोज जरांगेंच्या ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिप प्रकरणी SIT चौकशीचे आदेश: फडणवीस

■ **मुंबई (सम्यक कासारे) :** मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. या क्लिपमधील संभाषणावरून सत्ताधारी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप होत असून, त्यात ५०० कोटी रुपयांचा उल्लेख असल्याचा दावा केला जात आहे. तसेच, संभाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचाही उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून या कथित ऑडिओ क्लिपची चर्चा सुरू आहे. क्लिपमधील आवाज भाजपच्या नेत्यांचे असल्याचा दावा काही नेत्यांनी केला आहे. मात्र, भाजपने या क्लिपशी आपला संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या संभाषणाची सत्यता तपासून आरोपांमागील तथ्य समोर आणण्याची मागणी जोर धरू लागली



आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी विशेष तपास पथक अर्थात SIT स्थापन करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती आहे. या तपासादरम्यान कथित ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळली जाणार आहे. क्लिपमधील आवाज नेमका कोणाचा आहे, संभाषण खरे आहे की त्यात काही बदल करण्यात आले आहेत, तसेच या संभाषणामागील संपूर्ण घटना काय आहे, याचा तपास केला जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कथित ऑडिओ क्लिपमधील आवाज नेमका कोणाचा आहे. यासाठी तांत्रिक तपासणीसह संबंधित पुराव्यांची पडताळणी केली जाण्याची शक्यता आहे. संभाषणाचा संदर्भ काय आहे आणि त्यातील दाव्यांना आधार देणारे पुरावे आहेत का, याचाही तपासात शोध घेतला जाऊ शकतो. SIT च्या तपासातून क्लिपची सत्यता, संभाषणाचा नेमका संदर्भ आणि या प्रकरणात करण्यात आलेल्या आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. आता तपास यंत्रणा कोणती माहिती समोर आणतात आणि कथित ऑडिओ क्लिपमागील सत्य काय आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

खासगी ट्रॅव्हल्सच्या मनमानी भाडेवाढीवर RTO ची नजर!

■ **पुणे (अभिजीत येरल्लू) :** दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची आर्थिक लूट रोखण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) खासगी बसचालक आणि ऑनलाइन तिकीट बुकिंग कंपन्यांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. संबंधित मार्गावरील एसटी महामंडळाच्या नियमित तिकीटदराच्या दीडपटापेक्षा अधिक भाडे आकारता येणार नाही. नियमांचे उल्लंघन केल्यास बसमालकांसह तिकीटविक्री करणाऱ्या कंपन्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. दिवाळीत एसटी आणि रेल्वेचे आरक्षण पूर्ण होत असल्याने अनेक प्रवासी खासगी बसचा पर्याय निवडतात. या वाढत्या मागणीचा फायदा घेत काही ट्रॅव्हल्स कंपन्या तिकिटांचे दर दुप्पट किंवा तिप्पट करत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर आरटीओने ही भूमिका घेतली आहे. प्रवाशांची फसवणूक टाळण्यासाठी संबंधित मार्गांवरील एसटीच्या भाड्याचा तक्ता खासगी बसमालकांना उपलब्ध करून दिला जाणार



आहे. खासगी बसमालकांसोबत झालेल्या बैठकीत आरटीओने प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबतही सूचना दिल्या. बसची तांत्रिक स्थिती, चालकांचे आरोग्य, स्वच्छता, वाहतूक नियमांचे पालन आणि क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक टाळण्यावर भर देण्यात आला. बसची नियमित तपासणी करण्यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रत्यक्ष बसमध्ये किंवा ऑनलाइन ॲप आणि संकेतस्थळांवरून निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक भाडे आकारल्यास संबंधितांवर कारवाई होईल. उदाहरणार्थ, एसटीचे तिकीट १०० रुपये असल्यास खासगी बसचे कमाल भाडे १५० रुपये असेल. दिवाळीत नियमांच्या अंमलबजावणीसाठी आरटीओ विशेष देखरेख ठेवणार आहे.

५ आयपीएल ट्रॉफी जिंकून देणारा दिग्गज मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक!

■ **वृत्तसंस्था:** आयपीएल २०२७ हंगामासाठी मुंबई इंडियन्सने महत्त्वाचा निर्णय घेत वेस्ट इंडिजचा माजी अष्टपैलू खेळाडू कायरन पोलार्ड याची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. शनिवारी फ्रँचायझीने याबाबत अधिकृत घोषणा केली. गेली १६ वर्षे पोलार्ड मुंबई इंडियन्सशी खेळाडू, मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक म्हणून जोडलेला असून आता त्याच्याकडे संपूर्ण संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. वयाच्या २२व्या वर्षी मुंबई इंडियन्समध्ये दाखल झालेल्या पोलार्डने संघाला अनेक संस्मरणीय विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यानंतर प्रशिक्षक म्हणूनही त्याने खेळाडूंना मार्गदर्शन केले. मुंबई इंडियन्सच्या सहमालक नीता अंबानी यांनी पोलार्ड हा संघाच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगत त्याच्या अनुभव, नेतृत्वगुण आणि खेळावरील सखोल ज्ञानामुळे तो मुख्य



प्रशिक्षक म्हणूनही संघाला नवे यश मिळवून देईल, असा विश्वास व्यक्त केला. मुंबई इंडियन्सची संस्कृती, खेळाडूंची मानसिकता आणि मोठ्या स्पर्धांतील दडपण याची पोलार्डला उत्तम जाण असल्याने त्याची नियुक्ती संघासाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्य प्रशिक्षकपद स्वीकारल्यानंतर कायरन पोलार्डनेही आनंद व्यक्त करत मुंबई इंडियन्स हा आपल्या आयुष्याचा आणि क्रिकेट कारकिर्दीचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून संघासोबत काम करताना मुंबई इंडियन्सच्या मूल्यांची आणि कामकाजाच्या पद्धतीची चांगली ओळख झाल्याचे तो म्हणाला. संघाचा यशस्वी वारसा पुढे नेणे, नवोदित खेळाडूंना घडवणे आणि चाहत्यांना आणखी संस्मरणीय क्षण देणे हेच आपले प्रमुख ध्येय असल्याचे पोलार्डने स्पष्ट केले. टी-२० क्रिकेटमधील बदलते तंत्र, आधुनिक रणनीती आणि स्पर्धेची वाढती तीव्रता याचा मोठा अनुभव त्याच्याकडे असल्याने संघाच्या भविष्यातील वाटचालीत त्याचा निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नव्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स युवा खेळाडूंना अधिक संधी देत संघातील एकजूट कायम ठेवण्यावर भर देणार असून, आयपीएल २०२७ मध्ये पुन्हा विजेतेपदासाठी जोरदार दावेदारी करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत या नियुक्तीतून मिळत आहेत.